नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १५५ * | * अमरावती * | सोमवार, दिनांक ८ डिसेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## घर कोसळुन २५ महिला जखमी

■ वृत्तसंस्था, हिमाचल, दि. ७ :

हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील चुरा उपविभागात शनिवारी दुपारी एक गंभीर दुर्घटना घडली. जांगरा ग्रामपंचायतीतील शावा गावात लग्न समारंभादरम्यान पारंपारिक नृत्यात सहभागी झालेल्या महिलांवर मातीचे जुने घर कोसळले. या अपघातात सुमारे २० ते २५ महिला जखमी झाल्या असून त्यांच्यावर सध्या तीसा येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. ही घटना शनिवार, ६ डिसेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास घडली. लग्नाच्या पाहुण्यांची गर्दी असताना महिलांचे पारंपारिक नृत्य सुरू होते. दरम्यान, घराचा एक खांब अचानक तुटला आणि क्षणार्धात संपूर्ण छत कोसळले.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## या, विदर्भात स्वागत असो!

विदर्भ १९५६ साली तत्कालीन मुंबई राज्यामध्ये समाविष्ट करण्यात आला. तेव्हा नागपूर ही मध्य प्रदेशची म्हणजेच (मध्य प्रांत आणि वऱ्हाड) सीपी अँड बेरारची राजधानी होती. नागपूर अंतर्गत ग्वाल्हेर, भोपाळ, इंदूर, रायपूर ही सर्व शहरे आणि परिसर होता. १९५६ ला नागपूरची राजधानी मुंबईला गेली तेव्हाचे विदर्भाचे आठ जिल्हे तत्कालीन मुंबई राज्यात सामील झाले. यावेळी मुंबई राज्यात गुजरातचा ही समावेश होता म्हणजे मुंबई आताच्या गुजरातची आणि विदर्भाची राजधानी होती. पण तत्पूर्वी आताचे छत्तीसगडचे रायपूर आणि आताच्या मध्य प्रदेशचे भोपाळ यांची राजधानी नागपूर शहर होती. विदर्भ वेगळा निघाल्यावर नागपूरचे राजधानीत्व गेले. नागपूर हे भारतातील असे दुर्भाग्यशाली शहर आहे की, जिथून राजधानी गेली आणि त्यानंतर आम्ही वर उल्लेख केलेल्या ठिकाणी आणि इतर अनेक शहरात नवनवीन राजधान्या तयार झाल्या. थोडक्यात एक वेळा राष्ट्रपती असलेल्याला जसे उपराष्ट्रपती व्हावे लागले तसाच प्रकार होऊन इतक्या मोठ्या प्रदेशाची राजधानी असलेल्या नागपूरला उपराजधानी व्हावे लागले. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन झाल्यावर त्यावेळी विदर्भातील अनेक प्रभावशाली नेत्यांमुळे भविष्यात विदर्भावर अन्याय होणार नाही यासाठी एक नागपूर करार करण्यात आला. या नागपूर कराराप्रमाणे उपराजधानी असलेल्या नागपुरात विधिमंडळाचे एक अधिवेशन घेण्यात येईल असे लेखी आश्वासन देण्यात आले होते. हे अधिवेशन दीड महिना म्हणजेच सहा आठवड्याचे असेल असे त्यावेळच्या लेखी करारात ठरले होते. त्यानंतर काही वर्षे ही परिपाठी पाळण्यात आली. १९७०-७१ पर्यंत हे अधिवेशन चार आठवड्यापेक्षा जास्त चालायचे. त्यावेळी विधानसभेत सत्तारूढ पक्षात काय किंवा विरोधी पक्षात काय एकाहून एक दिग्गज मंडळी होती. तेव्हा लोकप्रतिनिधी किंवा मंत्र्यांची अर्थसत्ता तेवढी मजबूत नव्हती कारण स्वातंत्र्य मिळून काहीच वर्षे झाली होती त्यामुळे तेव्हा स्वार्थसत्ता ही नव्हती. दिलेले शब्द पाळलेच पाहिजेत याची जाणीव त्यावेळच्या नेत्यांना होती. तेव्हा सत्तेत काँग्रेस पक्षच होता. त्यानंतर मात्र हळूहळू विदर्भाच्या अधिवेशनाची टांग खेचणे सुरू झाले मग कधी अधिवेशन तीन आठवडे, कधी दोन आठवडे तर कधी कधी एकच आठवडा असे प्रकार होऊ लागले. उद्धवराव मुख्यमंत्री असताना दोन वर्षे नागपूरला अधिवेशन झालेच नाही. नागपूरच्या अधिवेशनात विदर्भाच्या प्रश्नांची चर्चा विशेष करून व्हावी असा सूर राहत असे. हळूहळू दिलेली सर्व आश्वासने हवेत विरून गेली. विदर्भाचे मुख्यमंत्री असले तरी विदर्भाच्या प्रश्नावर कधी फारसा खल झाला नाही. आता विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपूरला घेण्याचा केवळ सोपस्कार उरलेला आहे. पाच सात दिवस अधिवेशन घ्यावे हा आता नागपूरची सैरसपाटी करण्याचा प्रयोग झालेला आहे, हे विधान आम्ही अत्यंत जबाबदारीने करीत आहोत. १९७१ पासून 'दैनिक महासागर' ने अनेकदा विदर्भात झालेल्या अधिवेशनाची मुक्त कंठाने वाहवा केली आहे. कधी कधी शेवटच्या दिवशी विदर्भासाठी मोठमोठी आश्वासने असणारी आश्वासन पत्रिका सभागृहात ठेवण्यात येत असे. एवढे करूनही विदर्भाचा अनुशेष अजून काही भरून निघालेला नाही. सुरुवातीच्या काळात पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांनी ओसाड पश्चिम महाराष्ट्राच्या जिल्ह्याचा असा काही विकास केला की त्याला तोडच नाही. त्यावेळचे तिकडचे आमदार त्यांच्या जिल्ह्यात ऐक्य करून कोणालाही मंत्री करा, पण त्याने आमच्या विभागाच्या विकासाचे काम करावे ही अपेक्षा ठेवत असत. इकडे विदर्भातील जिल्ह्याचे आमदार कधीच एकजुटीने वागले नाहीत. एक तर मला मंत्री करा किंवा मग जिल्ह्यातल्या कोणालाही मंत्री करू नका अशा विचित्र प्रकारांनी वागत होते. आता गेली दहा-अकरा वर्षे विदर्भाचे मुख्यमंत्री आहेत मधली अडीच वर्षे सोडल्यास विदर्भासाठी अनेक निर्णय घेण्यात आलेले आहेत. पण जुन्या काळात शिलकीच्या असलेल्या महाराष्ट्राला आता दहा लाख कोटी रुपयांच्या कर्जात बुडवण्यात आलेले आहे. राजकारणात एकदा सत्ता आली की हुशार माणूस एका वर्षात करोडपती आणि पाच वर्षात अरबपती बनतो. सामान्य शेतकऱ्याच्या शेतात एकरी हजार रुपयांचे उत्पन्न होत असेल तर यांच्या एका एकरातच लाखाचे उत्पन्न होते. सत्ता आली की काही अपवाद सोडल्यास सर्वपक्षीय उत्पन्न वाढीचे मार्ग खुले होतात. आज महाराष्ट्रात उच्चविद्या विभूषित पृथ्वीराज चव्हाण हेच काय ते बिन डागाळलेले मुख्यमंत्री आहेत पण ते जनतेलाही पचत नाहीत आणि सहकाऱ्यांनाही आवडत नाहीत. आपल्या राजकारण्यांची राजकारणात येण्यापूर्वीची संपत्ती कायम ठेवून त्यांनी त्यानंतर कमावलेली सर्व संपत्ती एखाद्या वटहुकूमाने जप्त केली. तर महाराष्ट्रावरील दहा लाख कोटी रुपयांचे कर्ज तर फिटेलच परंतु आणखी दहा लाख कोटी रुपये शिल्लक उरतील अशी परिस्थिती आहे. राजकारणातील साधनशुचिता जपणारी मंडळी अपवाद स्वरूपातच आहेत. अशा परिस्थितीत आता विदर्भात अधिवेशन घ्या किंवा घेऊ नका त्याने फारसा फरक पडत नाही. राजधानीत जे असायला हवे ते सर्व नागपुरात आहे म्हणून अधिवेशनाचा हा थाटमाट सरकार आणि नागपूरकरांसाठीही डोकेदुखीचाच आहे. यामुळे आम्ही वर दिलेले व्यावहारिक सल्ले अंमलात आणणे कोणाच्याच बापालाही शक्य नाही. हे ठाऊक असूनही आम्ही जो आगाऊपणा केला आहे त्याबद्दल आम्ही करबद्ध क्षमाप्रार्थी आहोत. आमच्या सर्व राजकारणी बंधूंचे भाग्य असेच उजळत राहो, महाराष्ट्रावर आणखी चार-पाच लाख कोटींचे कर्ज झाले तरी हरकत नाही. त्यांच्या बरकतीचे प्रयत्न भविष्यातही चालू राहोत एवढीच आमची मनोमनीची इच्छा आहे. अशा वातावरणात विदर्भ भूमीत आपले स्वागत आहे, आम्ही आपल्यासाठी पायघड्या घालून उभे आहोत.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## गोव्यात नाइट क्लबमध्ये सिलेंडरचा स्फोट

# २५ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पणजी, दि. ७ :

उत्तर गोव्यात शनिवारी रात्री उशिरा एका नाईटक्लबमध्ये आग लागली. किमान २५ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. पोलिसांनी सांगितले की आग सिलेंडरच्या स्फोटानंतर लागली. मुख्यमंत्री प्रमोद सावंत म्हणाले की बहुतेक मृतांमध्ये स्वयंपाकघरातील कामगार होते, ज्यात तीन महिलांचा समावेश आहे. त्यांनी असेही सांगितले की मृतांमध्ये "तीन ते चार पर्यटक" होते.

घटनास्थळी पोहोचलेल्या सावंत यांनी पत्रकारांना सांगितले की २३ जणांपैकी तीन जणांचा मृत्यू भाजल्याने झाला आणि उर्वरित मृत्यू गुदमरल्याने झाला. तथापि, नंतर मृतांचा आकडा २५ वर पोहोचला. गोवा पोलिसांनी सांगितले की, "उत्तर गोव्यातील अपोर्रा येथील बिर्च बाय रोमियो लेन येथे भीषण आग लागली, ज्यामध्ये चार पर्यटक आणि १४ क्लब कर्मचाऱ्यांसह २५ जणांचा मृत्यू झाला. सात जण जखमी झाले आहेत आणि त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आगीचे कारण अद्याप कळलेले नाही. पोलिस आणि अग्निशमन विभाग तपास करत आहेत. कायदेशीर कारवाई केली जात आहे. बहुतेक मृत्यू धुरामुळे श्वासोच्छवासामुळे झाले आहेत."
मुख्यमंत्र्यांनी सांगितले की प्राथमिक माहितीनुसार नाइटक्लबने अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन केले नव्हते. मध्यरात्री बिर्च बाय रोमियो लेन येथे अचानक आग भडकली. गोव्याची राजधानी पणजीपासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या अरपोरा गावातील हे



लोकप्रिय पार्टी ठिकाण गेल्या वर्षीच सुरू झाले होते.

सावंत म्हणाले, "क्लब व्यवस्थापनाविरोधात आणि ज्यांनी नियमांचे उल्लंघन असूनही परवानगी दिली त्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल." त्यांनी या घटनेला पर्यटन हंगामाच्या शिखर काळात घडलेला अत्यंत दुर्दैवी प्रसंग असे वर्णन केले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, "या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी केली जाईल आणि दोषींना कुठल्याही परिस्थितीत वाचू दिले जाणार नाही." गोवा पोलिस प्रमुख आलोक कुमार यांनी माहिती दिली की सिलेंडरचा स्फोट झाल्यामुळेच ही आग लागली.

स्थानिक भाजपा आमदार मायकल लोबो म्हणाले, "सर्व २३ मृतदेह परिसरातून बाहेर काढण्यात आले आहेत आणि बांबोलीम येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आले आहेत." लोबो यांनी पत्रकारांना सांगितले की, अग्निशमन दलाचे जवान आणि पोलिस पथके तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि रात्रभर बचाव कार्यात काम केले. अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून अधिकारी सर्व क्लबचे अग्निसुरक्षा ऑडिट करतील असे लोबो म्हणाले. आमदार म्हणाले की, कलंगुट पंचायत सोमवारी सर्व नाईटक्लबना नोटीस बजावेल आणि त्यांना अग्निसुरक्षा परवाने घेण्यास सांगेल. त्यांनी असेही म्हटले की, आवश्यक परवानग्या नसलेल्या क्लबचे परवाने रद्द केले जातील.

### पंतप्रधानांकडून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाखांची मदत जाहीर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स-पोस्टवर या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. त्यांनी लिहिले की, "गोव्यातील अपोर्रा येथील आग अत्यंत दुःखद आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे त्यांच्याबद्दल माझे संवेदना. जखमी लवकरात लवकर बरे व्हावेत. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत जी यांच्याशी परिस्थितीबद्दल बोललो. राज्य सरकार बाधितांना सर्वतोपरी मदत करत आहे." राष्ट्रपतींनी या घटनेवर दुःख व्यक्त करत लिहिले की, "उत्तर गोवा जिल्ह्यातील आगीच्या दुर्घटनेने खूप दुःख झाले आहे, ज्यामध्ये अनेक मौल्यवान जीव गेले आहेत. शोकाकुल कुटुंबांना माझ्या मनापासून संवेदना. या कठीण काळात त्यांना शक्ती मिळो." जखमींच्या लवकर बरे होण्याची मी प्रार्थना करतो." दरम्यान, पंतप्रधान मोदींनी मृतांच्या कुटुंबियांना पंतप्रधान मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५०,००० रुपये भरपाई जाहीर केली.

### कारची ट्रेलरला समोरासमोर धडक

## ५ मित्र जागीच ठार

■ वृत्तसंस्था, जशपूर, दि. ७ :

जशपूर जिल्ह्यात झालेल्या एका भयानक रस्ते अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला. रविवारी रात्री उशिरा, एका भरधाव वेगाने येणाऱ्या कारने अचानक नियंत्रण गमावले आणि समोरून येणाऱ्या ट्रेलरला धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कार पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आणि त्यातील पाच तरुणांचा जागीच मृत्यू झाला. दुलदुला पोलिस स्टेशन परिसरातील पत्राटोलीजवळ हा अपघात झाला, जिथे रस्त्याच्या एका वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि गाडी थेट ट्रेलरला धडकली.

मिळालेल्या माहितीनुसार, हे तरुण एका सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गेले होते आणि रात्री उशिरा घरी परतत होते. कार्यक्रमानंतर घरी परतण्याच्या घाईत, गाडीने वेग वाढवला. रस्ता तुलनेने ओसाड होता, त्यामुळे चालकाने गाडीचा वेग कमी केला नाही. पत्राटोलीजवळ समोरून येणाऱ्या ट्रेलरला पाहून त्याचे अचानक गाडीवरील नियंत्रण सुटले आणि तो समोरासमोर आदळला.

टक्कर झाल्यानंतर, जवळच्या परिसरातील ग्रामस्थ घटनास्थळी धावले, परंतु गाडीत अडकलेल्या तरुणांना वाचवण्याचा कोणताही मार्ग नव्हता. गाडीचे मोठे नुकसान झाले आणि सर्वांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की, घटनास्थळी पोहोचल्यानंतर, पोलिस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून ताबडतोब कार हटवण्यासाठी क्रेन बोलावली. पोलिसांनी मृतांची ओळख पटवली आणि त्यांच्या कुटुंबियांना माहिती दिली. कुटुंबियांना सांत्वन मिळाले नाही.

सर्व तरुण एकाच परिसरातील रहिवासी होते आणि जवळचे मित्र होते असे वृत्त आहे. संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की कारचा वेग जास्त असल्याने आणि रात्रीच्या वेळी दृश्यमानता कमी असल्याने हा अपघात झाला आहे. शिवाय, ज्या रस्त्यावर टक्कर झाली तो रस्ता धोकादायक मानला जातो, ज्यामध्ये यापूर्वी अनेक अपघात झाले आहेत. पोलिसांनी ट्रेलर चालकाचीही चौकशी केली आहे आणि सविस्तर चौकशी सुरू आहे.

भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने या रस्त्यावर स्पीड ब्रेकर, इशारा देणारे फलक आणि चांगली प्रकाशयोजना बसवावी अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे. प्रशासनाने लोकांना रात्रीच्या वेळी काळजीपूर्वक वाहन चालवण्याचे आणि वेगमर्यादा पाळण्याचे आवाहनही केले आहे.

## कार दरीत कोसळुन सहा भाविकांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, सप्तश्रृंगगड, दि. ७ :

सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनाला जात असलेल्या भाविकांचे वाहन खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात सहा भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. स्थानिक लोकांच्या मदतीने बचाव कार्य सुरू असून मृतांमध्ये तीन महिला आणि तीन पुरुषांचा समावेश असल्याची माहिती आहे. रविवारी सकाळी एमएच १५ बीएन ०५५५ क्रमांकाच्या स्विफ्ट कारने सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनाला जात होते. नांदुरी ते सप्तश्रृंगगड दरम्यान असलेल्या ररन गडाजवळील भवरीनाला धबधबा घाट परिसरातून भाविकांचे वाहन जात होते. एका वाहनाला ओलांडून जाण्याच्या प्रयत्नात स्विफ्ट चालकाचा त्याच्या वाहनावरील ताबा सुटला आणि संरक्षक कठड्याला धडक दिली. संरक्षक कठडे कमकुवत असल्याने कार सातशे फुट खोल दरीत कोसळली. अपघाताची माहिती समजताच सप्तश्रृंगी देवी ट्रस्टच्या आपत्ती व्यवस्थापन व्यवस्थेचे पथक, ग्रामपंचायत यंत्रणा, रोपवे ट्रॉलीचे पथक, वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

### कोर्टाच्या आवारात महिलेवर सामूहिक अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, ठाणे, दि. ७ :

'बर्थडे' सेलिब्रेशनच्या बहाण्याने एका विवाहित महिलेला कारमध्ये बोलावून, तिला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. घटनेच्या दिवशी, म्हणजेच २५ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास एका आरोपीने स्पा सेंटरमध्ये जाऊन पीडितेकडून मसाज करून घेतला. त्यानंतर 'आज माझा वाढदिवस आहे, केक कापायचा आहे' असे सांगून तिला 'इर्टिगा' कारमध्ये बोलावले. आरोपींनी गाडी थेट ठाणे फॅमिली कोर्टाच्या अंधाऱ्या पार्किंगमध्ये नेली. तिथे केक कापताना त्यांनी त्यात आधीच गुंगीचे औषध मिसळले होते. हा केक खाल्ल्यानंतर पीडितेची शुद्ध हरपली. गाडीतील दोन्ही नराधमांनी तिच्यावर आळीपाळीने अत्याचार केला.










वांद्रे आणि वरळीतील राड्यानंतर मातोश्रीवर खलबते

## उद्धव ठाकरेंनी बोलावली बैठक



**मुंबई :** मुंबईत गेल्या काही दिवसांत वांद्रे आणि वरळी येथील सेंट रेजिस हॉटेलमध्ये भाजप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात झालेल्या राड्यानंतर आता पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. कामगार क्षेत्रात भाजपची वाढती घुसखोरी रोखण्यासाठी आणि त्यांना जशास तसे उत्तर देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी रविवारी दुपारी 'मातोश्री'वर अखिल भारतीय कामगार सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली. या बैठकीत त्यांनी भाजपची मक्तेदारी मोडून काढण्याचे आदेश देतानाच, पक्षातील काही ज्येष्ठ नेत्यांची चांगलीच शाळा घेतली. "भारतीय कामगार सेना ही कुणाचीही वैयक्तिक जहागिरी नाही, त्यामुळे एकसंघ राहून काम करा," अशा कडक शब्दांत ठाकरेंनी नेत्यांचे कान टोचले आहेत. राज्यातील विविध भागांतील कामगार सेनेच्या युनिट्सचे पदाधिकारी दुपारी 12 वाजता मातोश्रीवर दाखल झाले होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी कामगार सेनेच्या अंतर्गत कारभारावर बोट ठेवले. कामगारांच्या हितासाठी आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायासाठी कामगार सेनेने आपला आवाज अधिक तीव्र केला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संघटनेत गटबाजी खपवून घेतली जाणार नाही, भारतीय कामगार सेना म्हणून सर्वांनी एकजूट दाखवावी, असा सज्जड दमही त्यांनी भरला.

# मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेचा विक्रम

## सौर ऊर्जा वापरामुळे विजेच्या दरात कपात करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. ७ :

देशात महाराष्ट्र हे सौर ऊर्जेचा शेतीत सर्वाधिक वापर करणारे राज्य ठरले आहे. शेतकऱ्यांसाठी फिडर सौर ऊर्जेवर आणून स्वतंत्र १६ हजार मेगावॅट वीज निर्मिती करु. त्यामुळे अन्य वापरातील विजेच्या दरात आपण दरवर्षी ३ टक्के कपात करुन ग्राहकांना स्वस्त वीज देऊ शकतो,असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे बोलताना केले.

'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत महाराष्ट्राने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा आज छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर पार पडला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. या विश्वविक्रमाची घोषणा करण्यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे कार्ल सॅविले हे ही यावेळी उपस्थित होते.

या सोहळ्यास राज्याचे अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, विधान परिषद सदस्य आ. संजय केणेकर, आ. अनुराधा चव्हाण, आ. नारायण कुचे,आ. प्रशांत बंब,आ. सुरेश धस, मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मित्राचे संचालक प्रवीण परदेशी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, सहसचिव (ऊर्जा) नारायण कराड, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट तसेच अभिनेते संदीप पाठक, योगेश शिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.




सुरुवातीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यातील सौरकृषी पंपाचे डिजिटल लोकार्पण करुन त्यांनी लाभार्थी शेतकऱ्यांशी दूरदृश्य प्रणालीने संवाद साधला. त्यानंतर गिनीज बुकचे निरीक्षक पंच कार्ल सॅविले यांनी विक्रमाची घोषणा केली. त्यानंतर त्यांनी प्रमाणपत्र व मेडल मान्यवरांना प्रदान केले. सौर कृषी पंप योजनेसाठी अर्थसहाय्य करणाऱ्या एआयआयबी बँकेसोबतच्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. बँकेचे प्रत्युष मिश्रा व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

कार्ल सॅविले म्हणाले की, विक्रमासाठी ३५ हजार पंप स्थापित करणे आवश्यक होते मात्र प्रत्यक्षात ४५ हजार ९११ पंप स्थापित करण्यात आले, हा एक विश्वविक्रम आहे. या प्रत्येक पंपाच्या उभारणी ते कार्यान्वयन या सर्वटप्प्यांवर पडताळणी करुनच या विक्रमास मान्यता देण्यात आली आहे असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात सुरुवातीला शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त राज्यातील जनतेचे आभार व्यक्त केले. हे जनतेला समर्पित वर्ष होते. सगळ्यांच्या जीवनात मूलभूत परिवर्तनसाठी योजना आणल्या त्या कार्यान्वित केल्या. महाराष्ट्र थांबणार नाही, असाच पुढे जात राहील, हा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

फडणवीस म्हणाले की, प्रखर दुष्काळाचा सामना करतांना नेहमीच पाण्याची आणि विजेची अडचण होती. जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याची उपलब्धता करतांना विजेच्या समस्येमुळे शेतकऱ्यांना सिंचन करण्यात अडचण होती. दिवसा वीज मिळावी ही प्रमुख मागणी होती. रात्री अपरात्री शेतावर जाण्यात विषारी जीवजंतू, जनावरांची भीती होती. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे फिडर हे सौर ऊर्जेवर नेण्याचे धोरण निश्चित केले. त्यातून एक लाख सोलर पंप ची योजना आखण्यात आली. ही योजना इतकी चांगली होती की, आपल्या राज्यातील ही योजना ही अन्य राज्यांनी जशीच्या तशी राबवावी,असे पत्र केंद्रामार्फत इतर राज्यांना पाठविण्यात आले. त्यानुसार कुसूम ही केंद्राची योजना तयार झाली. याच योजनेअंतर्गत आज देशात सर्वाधिक ७ लाख पंप राज्याने बसविले आहेत. शेतकऱ्यांनी मागणी केल्यापासून ते पंप बसविण्याच्या क्षमतेत वाढ कऊन आपण प्रतिक्षा कालावधीत कमी केला. महावितरणचे कर्मचारी, अधिकारी, सगळ्या पुरवठादारांचे कर्मचारी, तंत्रज्ञ यांच्या मेहनतीमुळे आज आपण हा विश्वविक्रम करु शकलो. आता हा आपला विक्रम आपणच मोडू,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुढच्या वर्षभरात सौर कृषी पंपांची संख्या १० लाख झाली पाहिजे,असेही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सांगितले.

फडणवीस म्हणाले की, अशा प्रकारे सौर ऊर्जेचा वापर वाढवून आपण शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र १६ हजार मेगा वॅट वीज निर्मिती करु शकतो. शिवाय ही वीज निर्मिती कोणत्याही प्रदुषणाशिवाय असेल. तिचा निर्मिती खर्च कमी असल्याने इतर क्षेत्राला लागणारी वीज मुबलक आणि स्वस्तात उपलब्ध होईल. त्यामुळे दरवर्षी ३ टक्क्यांनी आपण विजेचे दर कमी करु, असेही त्यांनी यावेळी घोषीत केले.

## माजी महापौर सई खराडे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत करणार प्रवेश



**कोल्हापूर :** कोल्हापूर शहराच्या राजकारणात आज अत्यंत महत्त्वाची आणि मोठी घडामोड घडत आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या माजी महापौर सई खराडे या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाहीर प्रवेश करत आहेत. ठाणे येथे हा पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला असून, स्वतः एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सई खराडे यांचा पक्षात सन्मानपूर्वक प्रवेश होणार आहे. या पक्षप्रवेशामुळे कोल्हापुरातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पक्षप्रवेश सोहळ्यासाठी कोल्हापूर उत्तरचे आमदार राजेश क्षीरसागर हे देखील विशेष उपस्थित राहणार आहेत, ज्यामुळे या कार्यक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे सई खराडे यांच्यासह त्यांचे चिरंजीव शिवतेज खराडे हे सुद्धा शिंदे गटात सामील होत आहेत. केवळ सई खराडेच नव्हे, तर त्यांच्यासोबत युवा पिढीतील शिवतेज खराडे यांच्या प्रवेशामुळे पक्षाला तरुण रक्ताची आणि नव्या उर्जेची साथ मिळणार आहे. सई खराडे यांची कोल्हापूरच्या राजकारणात एक अनुभवी नेत्या अशी ओळख आहे. त्यांनी यापूर्वी शिवाजी पेठेतील चंद्रेश्वर प्रभागातून दोन वेळा कोल्हापूर महानगरपालिकेत प्रतिनिधित्व केले आहे, तसेच 2005 साली त्यांनी कोल्हापूरचे महापौरपदही भूषविले होते. त्या कृषीभूषण कै. महिपतराव उर्फ पापा बेंद्रे यांच्या कन्या आणि माजी नगराध्यक्ष कै. सखारामबापू खराडे यांच्या स्नुषा आहेत. असा भक्कम राजकीय आणि सामाजिक वारसा त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांच्या या निर्णयाचे मोठे वजन मानले जात आहे. सई खराडे यांच्या या प्रवेशामुळे कोल्हापूरमध्ये शिंदे गटाची ताकद मोठ्या प्रमाणावर वाढणार असल्याचा अंदाज राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केला आहे.

## महापरिनिर्वाणदिनी सेवाकुंडची चहा बिस्कीट सेवा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

मानवता हाच खरा धर्म आणि गोरगरबांची सेवा हेच या धर्माच मर्म! हे तत्व लक्षात ठेऊनच डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवाकुंड ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या वतीने दरवर्षी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून त्यांचे दर्शन घेऊन त्यांना वंदन करण्यासाठी दादर चैत्यभूमी आणि शिवाजी पार्क परिसरात संपूर्ण देशभरातून येणाऱ्या बाबासाहेबांच्या अनुयायांना आपला खारीचा वाटा म्हणून अल्पोपहार दिला जातो.

या वर्षी चहा बिस्कीटांचे मोठ्या प्रमाणावर वाटप करण्यात आले. डॉ.बाबासाहेबांच्या 69 व्या महापारीनिर्वाण दिनी सेवाकार्याचा शुभारंभ ट्रस्टचे अध्यक्षअश्वजीत भैया गायकवाड यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. या प्रसंगी सेवाकुंड ट्रस्टचे , तज्ञ सल्लागार जयश्रीताई गायकवाड, सरचिटणीस अभिजीत गायकवाड, विश्वस्त चित्राताई गायकवाड,ट्रस्टी संजय कर्णिक, नंदकुमार शहाडे आदी मान्यवर उपस्थित होते. याच कार्यक्रमात बुद्धगया येथील भंतेजींनी बुद्ध वंदना सादर करून गायकवाड परिवाराला शुभाशीर्वाद दिले. हा संपूर्ण कार्यक्रम सेवाकुंड ट्रस्टच्या महाराष्ट्र भरातून आलेल्या कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमाने पार पडला. दरवर्षी समाजासाठी विविध सामाजिक उपक्रम ट्रस्ट राबवित असते.

# 'महायुती'चा सूर जुळला

## एकनाथ शिंदे- रवींद्र चव्हाण एकाच मंचावर

■ महासागर प्रतिनिधी, ठाणे, दि. ७ :

नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजप आणि शिवसेना शिंदे गटात धुमसत असलेल्या वादाला अखेर पूर्णविराम मिळाल्याचे चित्र आहे. फोडाफोडीचे राजकारण आणि स्थानिक निवडणुकांवरून निर्माण झालेली कटुता विसरून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे नेते रवींद्र चव्हाण आज डोंबिवलीत एकाच मंचावर अवतरले. विशेष म्हणजे, खासदार श्रीकांत शिंदे यांनी चव्हाण यांचे हस्तांदोलन करत केलेले स्वागत राजकीय वतुर्ळात चर्चेचा विषय ठरले आहे.

नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवलीत महायुतीत मोठी ठिणगी पडली होती. भाजप नेते रवींद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने शिंदेंच्या शिवसेनेला खिंडार पाडल्याच्या चर्चा होत्या. यामुळे स्थानिक शिवसैनिक आक्रमक झाले होते. हा वाद इतका विकोपाला गेला की, हे प्रकरण थेट दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या दरबारात पोहोचले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत अमित शहा यांची भेट घेऊन, हे प्रकरण त्यांच्या कानावर घातल्याच्या चर्चा होत्या. मात्र, आता या हायव्होल्टेज ड्राम्यावर पडदा पडल्याचे दिसत आहे. डोंबिवलीतील सावळाराम क्रीडा संकुलाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नूतनीकरणाच्या भूमिपूजन सोहळ्यात हे मनोमिलन पाहायला मिळाले. मंचावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि रवींद्र चव्हाण एकत्र आले. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे यांनी पुढाकार घेत रवींद्र चव्हाण यांचे हसून स्वागत केले आणि हस्तांदोलन केले. त्यांच्या या एका कृतीने दोन्ही पक्षांतील तणाव निवळल्याचा संदेश कार्यकर्त्यांना दिला आहे.



आपल्या भाषणात चव्हाण यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांचा उल्लेख 'कल्याण लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार' असा केला. रविंद्र चव्हाणांनी त्यांच्या भाषणात सतत महायुतीचा उल्लेख केला. "महायुती म्हणून आम्ही विकासाची कामे केली आहेत आणि पुढेही करत राहू. एकविचाराचे सरकार असले की विकास वेगाने होतो," असे सांगत त्यांनी वादाच्या चर्चांना बगल दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून अनेक विकास कामे पार पडत आहेत. शिंदे साहेब जेव्हा मुख्यमंत्री झाल्या त्यानंतर या कल्याण डोंबिवलीत निधी मिळू लागला आहे.

## उद्धव ठाकरे वैफल्यग्रस्त त्यांना टोमणे मारणे हाच एक उद्योग राहिलाय



संजय शिरसाट यांचा हल्लाबोल

**छत्रपती संभाजीनगर :** उद्धव ठाकरे हे वैफल्यग्रस्त झाल्याने त्यांना टोमणे मारणे आणि टीका करणे हाच एक उद्योग राहिला आहे. महायुतीमध्ये आम्ही काय सुरू आहे, याच्याशी तुम्हाला काय करायचे आहे? तुम्ही तुमचे पाहा ना? असा टोला शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी उद्धव ठाकरेंना लगावला आहे. मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, तुमचे अस्तित्व काय आहे यावर तुम्ही बोलले पाहिजे. स्वतःच पक्ष सोडून इतरांच्या पक्षात नाक खूपसण्याचे कारण काय? असा सवाल शिरसाट यांनी केला आहे. आम्ही कसे काम करतो हे महाराष्ट्रातील जनतेनी पाहिले आहे. त्यांना माहिती आहे की आम्ही कसे काम करतो. तुमच्या सांगण्यामुळे काही फरक पडतो असे समजू नका. संजय शिरसाट म्हणाले की, उद्धव ठाकरे दिल्लीमध्ये भेटी घेण्यासाठी चालले आहेत. त्यांना तिथे जाऊन गळा भेट घेत आम्हाला पदरात घ्यावे असे काहीही म्हणावे. पण असे बोलून स्वतःचे हसू का करुण घेतात. आमच्या पक्षाची चिंता तुम्हाला काबर आहे तुमच्या सांगण्याने पक्ष चालेल का? आमच्या नेत्यांना कसा पक्ष चालवायचा हे समजत नाही का? आमचा पक्ष कोणी चालवत नाही आमचा पक्ष एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष अजित पवार चालवतात असे म्हणत शिरसाट यांनी उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिले आहे.

# पोलिस उपनिरीक्षक प्रमोद चिंतामणी सेवेतून बडतर्फ

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ७ :

पिंपरी-चिंचवड पोलिस दलाला काळीमा फासणाऱ्या एका गंभीर प्रकरणात पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. दोन कोटी रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी आणि 'दाम दुप्पट' योजनेच्या नावाखाली नागरिकांची कोट्यवधींची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक प्रमोद चिंतामणी याला अखेर शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. चिंतामणीच्या वाढत्या गुन्हेगारी कृत्यांची आणि गैरव्यवहारांची गंभीर दखल घेत आयुक्तांनी हे आदेश जारी केले आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने 2 नोव्हेंबर रोजी केलेल्या धडक कारवाईत प्रमोद चिंतामणी याला रंगेहाथ पकडले होते. आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असताना एका प्रकरणात तडजोड करण्यासाठी त्याने तब्बल दोन कोटी रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यातील 46 लाख 50 हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने सापळा रचून त्याला अटक केली. या कारवाईनंतर तपास पथकाने त्याच्या घराची झडती घेतली असता, तिथेही 51 लाख रुपयांची बेहिशोबी रोकड आढळून आली होती.

केवळ लाचखोरीच नव्हे, तर चिंतामणी याने सर्वसामान्यांचीही मोठी फसवणूक केल्याचे तपासात उघड झाले आहे. पिंपरी-चिंचवड परिसरातील 40 हून अधिक नागरिकांना "पैसे दुप्पट करून देतो" असे आमिष दाखवून त्याने तब्बल 5 कोटी रुपयांचा गंडा घातल्याचे समोर आले आहे.

या काळ्या धंद्यातील पैसे त्याने स्वतःच्या मेहुण्याच्या बँक खात्यावर वळते केले होते. या संदर्भात फसवणूक झालेल्या अनेक पीडित नागरिकांनी भोसरी पोलिस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या आहेत.

# गुजरातचा हापूस टॅगवर दावा

## महाराष्ट्रातून संताप, जीआय टॅगसाठी महाराष्ट्र-गुजरात भिडणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

जगात सर्वांचा लाडका आणि कोकणसह महाराष्ट्राचा अभिमान असलेल्या हापूसच्या भौगोलिक मानांकनावर गुजरातच्या दाव्यामुळे वादाला तोंड फुटले आहे. गुजरातने वलसाड हापूस नावाने भौगोलिक मानांकन मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. त्यावरून महाराष्ट्रातील हापूस उत्पादक आणि विक्रेते आक्रमक झाले आहेत. याविरोधात न्यायालयीन लढ्याचीही त्यांनी तयारी दर्शवली आहे.

कोकणातील हापूस आंब्याला यापूर्वीच जीआय टॅग मिळाला आहे. पण आता गुजरातमधील गांधीनगर व नवसारी विद्यापीठाने २०२३ मध्ये वलसाड हापूस नावाने भौगोलिक मानांकन मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. या अर्जावर कायदेशीर सुनावणी सध्या सुरू आहे. त्यामुळे हापूस आंब्याला मिळालेले कोकण हापूस हे जगातले पहिले जीआय मानांकन धोक्यात येण्याची शक्यता असल्याने कोकणातील आंबा बागायतदारांची चिंता वाढली आहे.



भारतात १२ ते १५ आंबा प्रजातींना जीआय टॅग मिळाला आहे. यात महाराष्ट्रातील कोकणचा हापूस, मराठवाडा केसर, गुजरातचा गीर केसर, उत्तर प्रदेशचा मलिहाबादी दशेहरी, रतौल आंबा, गोव्याचा मानकुराद आंब्यांचा समावेश होतो. गुजरातला हापूस'चे मानांकन मिळू नये. त्यांनी त्यांच्या आंब्याला वलसाड आंबा' म्हणून विकावे. कोकणचा हापूस हे मानांकन आमच्या शेतकऱ्यांसाठी अबाधित राहावे यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. गरज पडल्यास हायकोर्ट ते सुप्रीम कोर्टापर्यंत लढायची कोकणी शेतकऱ्यांची तयारी आहे. कोकण हापूसला २००८ मध्ये जीआय मानांकन मिळाले. येथील भौगोलिक परिस्थिती, माती आणि विशिष्ट चव (इसेन्स) यावर आधारित सर्व कागदपत्रे २०१८ पर्यंत सादर करण्यात आली होती.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**दर्यापूर :** दर्यापूर येवदा पोलिस स्टेशन हद्दीत येणाऱ्या लासूर गावाजवळील एका पोल्ट्री फॉर्मजवळ अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत २७ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. सदर घटना शुक्रवार (दि.५) रात्री आठ वाजेच्या सुमारास घडली. श्रीकांत प्रभाकर बावनेर (३७, रा. भांडपूरा चौक, जुने शहर अकोला) असे मृत तरुणाचे नाव आहे. घटनेच्या वेळी मृतक श्रीकांत बावनेर हा दुचाकी (क्र. एम.एच.३०, बी झेड ८९५६) या गाडीने गावी अकोल्याकडे जात होता. दरम्यान दर्यापूर-अकोला मार्गावर लासूर गावाजवळील मुख्य रस्त्यावर एका पोल्ट्री फॉर्म जवळच्या कॉर्नरवर अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला धडक दिली.

# भाजपचा मुख्य फंडा धार्मिक ध्रुवीकरण, मतचोरी

## बाळासाहेब थोरात यांचे 'लोकशाहीची हत्या' प्रदर्शनातून पुणेकरांना आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ७ :

माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. सत्तेत राहण्यासाठी भाजप धार्मिक ध्रुवीकरण आणि मतचोरीचा वापर करत असून, ईव्हीएम प्रक्रियेबाबतही गंभीर शंका निर्माण झाल्याचे ते म्हणाले. लोकशाही वाचवण्यासाठी पुणेकरांनी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित 'सेवा, कर्तव्य, त्याग' सप्ताह कार्यक्रमात 'लोकशाहीची हत्या व वोटचोरी' या विषयावरील विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन थोरात यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.



थोरात यांनी आपल्या भाषणात सांगितले की, २००४ ते २०१४ या काळात काँग्रेस सरकारने अन्न सुरक्षा कायदा, शैक्षणिक योजना, भू-अधिग्रहण कायद्यात सुधारणा आणि पोलिओ निर्मूलन यांसारखे अनेक लोककल्याणकारी उपक्रम राबवले. मात्र, २०१४ नंतर भाजपने तांत्रिक साधने, अफवा आणि जातीय ध्रुवीकरणाचा वापर करून सत्ता मिळवली आणि देशाची दिशा भरकटवली.

महाराष्ट्र हा संतांची परंपरा जपणारा प्रदेश असताना, आज धमार्चे उघडपणे राजकारण केले जात आहे, यावर थोरात यांनी चिंता व्यक्त केली. सोनम वंगचुक, हरियाण्यातील शेतकरी आंदोलन, महिला ऑलिम्पिक विजेत्यांचे आंदोलन यांसारख्या घटनांनंतरही समाजाची उदासीनता लोकशाहीसाठी घातक असल्याचे मत त्यांनी मांडले. यावेळी बोलताना युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे म्हणाले की, मोदी सरकार मतचोरीच्या विशिष्ट पॅटर्नवर सत्तेत आले आहे, जी जनतेची आणि लोकशाहीची मोठी फसवणूक आहे. निवडणुकांचे निकाल पुढे ढकलणे आणि ईव्हीएमच्या जोरावर सत्ता मिळवणे ही पद्धत लोकशाहीसाठी धोकादायक आहे. मोदी सरकारला रोखण्यासाठी जनआंदोलन उभारण्याची आणि सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

शिवसेनेचे शहरप्रमुख संजय मोरे म्हणाले की, विविध राष्ट्रीय मुद्द्यांवर राहुल गांधी यांनी आवाज उठविल्यामुळे जनजागृतीला गती मिळाली आहे. आपले मत नक्की कुठे आणि कसे जाते याचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रदर्शनातून करण्यात आला असून आर्थिक भ्रष्टाचारासोबत मतचोरी ही भाजपची मोठी चाल असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

## तीन अपघातांत चार ठार

### महिलांसह १६ वर्षीय मुलाचा बळी

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ७ :

नाशिक शहरात रस्ते अपघातांचे प्रमाण कमी होण्याचे नाव घेत नाही. वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चार अपघातांत चार जणांचा मृत्यू झाला असून मृतांमध्ये १६ वर्षीय किशोर आणि दोन महिला दुचाकीस्वारांचा समावेश आहे. नाशिक रोड, उपनगर, सातपूर आणि भद्रकाली पोलिस ठाण्यांमध्ये याबाबत गुन्हे नोंदवले गेले आहेत. पहिली घटना नाशिक रोड परिसरात घडली. सोहेल साजिद बागवान (वय १६, गोसावीवाडी, नाशिक रोड) बुधवार, ३ डिसेंबर रोजी विवाहसमारंभासाठी सिन्नरफाटा भागात गेला होता. रात्री साधारण साडेदहा वाजता तो दुचाकीवरून घरी परतत असताना नाशिककडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एका वेगवान चारचाकी वाहनाने त्याला समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी झाला. बेशुद्ध अवस्थेत त्याला जयराम रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण मध्यरात्री डॉक्टर मेरी गट्टल यांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणाची चौकशी नाशिक रोड पोलिस ठाण्यातील हवालदार सानप करत आहेत.

दुसरी घटना त्र्यंबकरोडवरील संस्कृति हॉटेल परिसरात झाली. सोमनाथ बाबूराव वडगे (वय ३५, बेझे फाटा, त्र्यंबकेश्वर) हे ३० नोव्हेंबरच्या संध्याकाळी रस्ता पार करत होते. त्याच वेळी त्र्यंबकेश्वरच्या दिशेने येणाऱ्या एका वेगवान चारचाकी वाहनाने त्यांना धडक दिली. ते गंभीर जखमी झाल्याने त्यांना सुविधा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# अमरावती जिल्ह्याच्या समस्या सभागृहाबाहेरच थंडीत गोठून पडतील?


## सत्तेत सर्वच 'मस्त', नवख्या आमदारांवरच भार
## हिवाळी अधिवेशनात अमरावती पुन्हा 'बॅक बेंच'वर

**रोहित गासे,**

**अमरावती,( दि.7 )** - राज्यातील भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी या त्रिमूर्ती सरकारला नुकतीच वर्षपूर्ती झाली. निवडणुकी दरम्यान अमरावतीकरांना मोठमोठी आश्वासने देणाऱ्या सत्ताधाऱ्यांना आता तीच आश्वासने सभागृहात आठवण करून देणारा बुलंद आवाज जिल्ह्यात उरलेला नाही. यंदाच्या नागपूर हिवाळी अधिवेशनातही अमरावती बॅक बेंच बसेल आणि समस्या सभागृहाच्या उंबरठ्याबाहेरच गोठून पडतील, अशी अवस्था निर्माण झाली आहे.

अमरावती, दर्यापूर, अचलपूर, मेळघाट, तिवसा, धामणगाव रेल्वे, भातकुली आणि मोर्शी असे आठ विधानसभा मतदारसंघ असलेल्या जिल्ह्यात दर्यापूर वगळता सर्वत्र सत्ताधारी आमदार आहेत. अनेकांचे लक्ष अजूनही आपल्या विजयसोहळ्यापलीकडे गेलेले नाही. गेल्या वर्षभरात कोणत्याही आमदाराने आपल्या नेतृत्वाला भिडून जिल्ह्याचे प्रश्न ठामपणे मांडण्याची हिम्मत दाखविली नाही. सत्तेतून विरोधकांना अडवण्यातच त्यांचा कालावधी गेला.

यंदा अधिवेशन अवघ्या एका आठवड्यापुरते मर्यादित असल्याने अमरावती जिल्ह्याचे गंभीर प्रश्न पुन्हा अधांतरी राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जिल्ह्यात प्रभावी आणि ठाम विरोधकांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. विधानसभेत लोकांच्या मुलभूत प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवणारा एकही नेता उरला नसल्याची चर्चा आहे. एकमेव विरोधी आमदार असले तरी ते कितपत प्रभावीपणे मुद्दे मांडतील, याबाबत संभ्रम आहे.



### जिल्ह्याचा 'आवाज' कुठे हरपला?

2019-2024 दरम्यान बच्चू कडू, यशोमती ठाकूर आणि देवेंद्र भुयार यांनी विधानसभेत जिल्ह्याचा आवाज बुलंद ठेवला होता. पण 2024 नंतर हा आवाज क्षीण झाला आहे. आता दर्यापूरचे नवे आमदार किती प्रभावी ठरतील, याबाबत शंका आहे. बडनेराचे आमदार सत्तेत असल्याने त्यांची तीव्र भूमिका अपेक्षित नाही. अशा परिस्थितीत गुन्हेगारी, पाणीटंचाई, मेळघाटातील आरोग्यस्थिती, अवैध व्यवहार, बदलीतील मनमानी हे प्रश्न कोण मांडणार? हिवाळी अधिवेशन हे जनतेचे प्रश्न मांडण्याचे व्यासपीठ. मात्र अमरावतीतून आवाजच नसल्याने प्रश्न कोण मांडणार? हा कळीचा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे.

### मेळघाटचे प्रश्न कायम गंभीर


मेळघाटातील बालमृत्यू, बालविवाह, धर्मांतराच्या तक्रारी, पाण्याची टंचाई, मोठ्या प्रमाणातील रिक्त पदे आणि संथ प्रशासन या सर्व समस्यांवर अद्याप ठोस उपाय नाहीत. अलीकडील 11 आयएएस अधिकाऱ्यांच्या पाहणी दौऱ्यानंतरही पूर्वनियोजनातच सगळे ठरते, तर वास्तव कसे दिसणार? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### वाढती गुन्हेगारी आणि रखडलेले प्रकल्प

अचलपूर-परतवाड्यातील अतिक्रमण, अवैध धंदे, चांदुरबाजारातील गुन्हेगारीची स्थिती, मोर्शीत वाढलेली गोवंश तस्करी, तर वरूडमधील वाळूच्या अवैध व्यवहारांवरील कारवाईचा अभाव या मुद्द्यांनी प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. अमरावती शहरात तर गुन्हेगारी वाढत असून केवळ एकच स्थानिक गुन्हे शाखा पथक असल्याने नियंत्रण दुर्बल झाले आहे. विदर्भात सर्वाधिक गुन्हे नोंदवले जाण्याचे 'पद' अमरावतीने राखले आहे. महिन्याला तिन खून, एमडीची वाढती चलती, गुटखा विक्री आणि वरली अड्डे—परिस्थिती गंभीर आहे. बडनेऱ्यात विकासकामे रखडली आहेत, तिवसामध्ये प्रकल्पांना ब्रेक लागलेला आहे, तर धामणगाव रेल्वेमधील प्रगती मर्यादित आहे.

# अमरावतीत एमडी तस्करी रॅकेटचा पर्दाफाश

## 7.41 लाखांचा मुद्देमाल जप्त; वडाळी पुलावर दोन युवक अटकेत



**महासागर | प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.7)** - शहरात एमडी (मेफेड्रोन) तस्करी आणि विक्रीचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. नुकतेच गुन्हे शाखेने नागपूरमधील मुख्य सप्लायरला पकडत मोठे जाळे उद्ध्वस्त केले होते. त्यानंतर रविवारी पुन्हा वडाळी पुलाजवळ कारवाई करत दोन युवकांना 69 ग्रॅम एमडीसह ताब्यात घेण्यात आले. एमडी, मोपेड, वजनकाटा आणि मोबाईल फोन असा एकूण 7 लाख 41 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटकेतील आरोपी मोहम्मद सोफियान मोहम्मद मनान (26) आणि शोएब खान जमीर खान (24) हे दोघेही अन्सारनगर, अमरावती येथील रहिवासी आहेत. गुन्हे शाखेला माहिती मिळाल्यानंतर वडाळी ब्रीज परिसरात सापळा रचण्यात आला. संशयित युवकांची चौकशी आणि वाहन तपासणीत मोपेडच्या डिकीतून 69 ग्रॅम एमडी आढळून आली. प्रारंभिक चौकशीत ते शहरातील सक्रिय एमडी सप्लाय नेटवर्कचा भाग असल्याचे स्पष्ट झाले. दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी फ्रेजरपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, या रॅकेटमध्ये आणखी कोण सहभागी आहे, याची चौकशी सुरू आहे.

### नागपूरचा मुख्य सप्लायरही तुरुंगात

15 ऑक्टोबर रोजी गाडगेनगर भागात अब्दुल राजीक अब्दुल ताहीर (32) याला 56 ग्रॅम एमडीसह पकडण्यात आले होते. त्याच्या माहितीवरून फैयाज अल्ताफ अहमद कुरेशी (29) या नागपूरमधील पुरवठादाराला 17 ऑक्टोबरला अटक करण्यात आली. पुढील तपासात शेख शाहिद शेख कासिफ याचे नाव पुढे आले. काही दिवस फरार राहिल्यानंतर 28 नोव्हेंबरला राजीव गांधी नगरातून त्याला पकडण्यात आले. तोच या रॅकेटचा मुख्य सप्लायर असल्याचे निष्पन्न झाले आहे.

### शहरात वाढता एमडीचा विळखा

गत काही महिन्यांपासून शहरात एमडीचे व्यसन आणि त्याचा खुलेआम व्यापार वाढत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी काही ठिकाणी एमडीचे व्यवहार सुरू असल्याचे दिसून आले. अलीकडच्या कारवायांतून शहरात एमडी ड्रग्स नेटवर्क सक्रिय असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### एमडी कुणाकडून घेतली आणि कुणाला देणार होते?

चौकशीत आरोपींनी सांगितले की, त्यांनी सैय्यद अल्तमश सैय्यद गफ्फार, गोलू कबीर, आवेज कुरेशी, साकीब कुरेशी उर्फ हग्या, आकीब कुरेशी, शेख नईम उर्फ राजा, शेख नाझीम, शेख सोनू (सर्व अमरावतीतील विविध भागांतील रहिवासी) यांच्याकडून एमडी घेतली होती. ही खेप ते त्यांच्या ग्राहकांपर्यंत पोहोचवत होते आणि प्रत्येक डिलिव्हरीवर त्यांना पैसे मिळत होते. पुढील तपास अँटी-नार्कोटिक सेलकडून सुरू आहे.

## घरात घुसून विवाहितेचा विनयभंग

**अमरावती** - अचलपूरातील एका 30 वर्षीय विवाहितेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पीडित महिला घरी एकटी असताना आरोपी घरात शिरला आणि तिचा विनयभंग केला. ही बाब कोणाला सांगितली तर पती-पत्नी दोघांनाही मारून टाकण्याची धमकी दिली.

# तिवसा येथे विषारी औषध अंगावर फेकून मारहाण

**तिवसा ( दि. 7 )** - शिवनगरी येथे महिलेसह तिच्या मुलावर विष फेकून तसेच घराचे नुकसान केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध तिवसा पोलिस ठाण्यात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना 5 डिसेंबर रोजी घडली.

फिर्यादी प्रिती धनराज लांडे (वय 48 वर्षे, रा. दिवे, शिवनगर वार्ड क्र. 2) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी आकाश, सोनू दिवे आणि योगेश यांनी तिच्या मुलावर आणि तिच्यावर पिचकारीतून विष फेकले. फिर्यादीचा मुलगा 4 डिसेंबरला रात्री 11.30 वाजता घरासमोर असताना आरोपींनी प्रथम त्याच्यावर विष टाकले. त्यानंतर 5 डिसेंबर रोजी पहाटे फिर्यादी अंघोळीला गेली असताना आरोपी आकाशने पुन्हा तिच्यावर विष फेकल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्याचबरोबर आरोपींनी फिर्यादीच्या घरातील पोर्चमधील पिलर आणि अंगणातील बिंद्रावन फोडून घराचे नुकसान केले. या सर्व प्रकारामुळे परिसरात तणावाचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी तिवसा पोलिसांनी आरोपी आकाश, सोनू दिवे आणि योगेश या तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून विषाचा प्रकार, त्याचा स्त्रोत आणि आरोपींच्या उद्देशाची चौकशी करण्यात येत आहे



## युवतीवर लैंगिक अत्याचार, जबरदस्तीने गर्भपात

**अमरावती** - अमरावती शहरात राहणाऱ्या 24 वर्षीय युवतीने नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात एका गंभीर प्रकरणाची तक्रार दाखल केली आहे. पिडित मुलीने सांगितले की, वाशिम जिल्ह्यातील बार्शीटाकळी येथील 28 वर्षीय तारिफ अब्दुल रशीद शेख या व्यक्तीने तिला लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध ठेवले, ज्यामुळे ती गर्भवती झाली. युवतीच्या तक्रारीनुसार, आरोपीने गर्भवती झाल्यानंतर तिला जबरदस्तीने गर्भपात करायला लावले आणि नंतर लग्न केले नाही. युवती सध्या आपल्या शिक्षणासाठी अमरावतीत राहत आहे आणि येथे कॉलेजमध्ये शिकत होती. नांदगाव पेठ पोलिसांनी युवतीच्या तक्रारीनुसार आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू केला आहे.

# तहसीलमधून चोरी गेलेला ट्रॅक्टर अकोल्यात सापडला

## दर्यापूर पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.7 )** - अवैध रेती वाहतूक प्रकरणात तहसील प्रशासनाने जप्त केलेला ट्रॅक्टर तहसील कार्यालयातूनच चोरून नेल्याची धक्कादायक घटना 3 डिसेंबरच्या मध्यरात्री घडली. मात्र, दर्यापूर पोलिसांनी तात्काळ तपासयंत्रणा कार्यान्वित केली. दरम्यानच 5 डिसेंबर रोजी अकोल्यातील खडकी संतोष नगर कॉलनी येथे हा ट्रॅक्टर बंद अवस्थेत शोधून काढला.

तलाठी मंडळ अधिकाऱ्यांनी अवैध रेती वाहतूक करत असलेला विना नंबरचा ट्रॅक्टर जप्त करून तहसील कार्यालयात जमा केला होता. रात्री उशीरा अज्ञात चोरट्याने कार्यालयातील लोखंडी गेट तोडून ट्रॅक्टर चोरीला नेला. पहाटे ही घटना उघडकीस येताच तहसील कार्यालयात एकच खळबळ उडाली. चोरीचा गुन्हा नोंदवल्यानंतर दर्यापूर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपास,



वाहन हालचालीचा मागोवा आणि सूत्रांच्या आधारे शोधमोहीम सुरू केली. तपासात, हा ट्रॅक्टर अकोला येथील खडकी संतोष नगर कॉलनीत बंद अवस्थेत सोडून दिलेला आढळला. घटनेनंतर चोरट्यांनी वाहन का सोडून दिले, ते कोणत्या मार्गाने गेले, आणि यामागे अवैध रेती टोळीचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिस करत आहेत. आरोपींची ओळख पटवण्यासाठी तांत्रिक पुरावे आणि स्थानिक माहितीचा आधार घेतला जात आहे.

### शदानी नगरमध्ये घरफोडी

**अमरावती** - बडनेरा पोलिस ठाणे हद्दीतील साईनगर परिसरातील शदानी नगर येथे घरफोडीची घटना घडली. गजानन वासुदेवराव लिचले (55) हे कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडले. घरातून अंदाजे 31 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे समजते. या प्रकरणी गजानन यांनी दिलेल्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# कुख्यात यश कडू पुन्हा ताब्यात; 4 दिवसांची पोलीस कोठडी

## जेवड नगर तोडफोड प्रकरणातील मुख्य आरोपी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )**- राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील जेवड नगर परिसरात 30 नोव्हेंबरच्या रात्री झालेल्या तोडफोड प्रकरणात कुख्यात गुंड यश कडू याला कारागृहातून पुन्हा ताब्यात घेण्यात आले आहे. या हल्ल्याचा सूत्रधार यश कडूच असल्याचा पोलिसांना संशय असून न्यायालयाने त्याला 8 डिसेंबरपर्यंत चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

30 नोव्हेंबरच्या मध्यरात्री जेवड नगरमध्ये भाजी विक्रेता शुभम जनबंधू यांच्या घरावर 20 ते 25 तरुणांनी तीक्ष्ण हत्यारे घेऊन हल्ला चढवला. शिवीगाळ करत त्यांनी घराबाहेर उभ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. या घटनेनंतर परिसरात तीव्र तणाव निर्माण झाला होता. तपासात उघड झाले की यश कडू आणि शुभम जनबंधू यांच्यातील जुन्या वैमनस्यातून या घटनांची मालिका सुरू झाली.

1 डिसेंबर रोजी यश कडूने शुभमकडे रोज 200 रुपयांच्या वसुलीची मागणी केली. शुभमने नकार दिल्यावर कडूने त्याला धमक्या दिल्या. त्याच दिवशी दुपारी दस्तुरनगर चौकात शुभम आणि त्याच्या सहकाऱ्यांनी यश कडूवर जीवघेणा हल्ला केल्याची नोंद आहे. प्रत्युत्तरादाखल कडू तलवार घेऊन चौकात दाखल झाला; त्यावेळी ठाणेदार पुनित कुलट यांनी त्याला ताब्यात घेतले आणि कारागृहात दाखल केले होते.

या सर्व पार्श्वभूमीवर जेवड नगरमधील तोडफोडही यश कडूच्या इशाऱ्यावरूनच झाली असावी, असा पोलिसांचा संशय आहे. तोडफोडीची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांनी परिसरात मोठा बंदोबस्त तैनात केला. शुभम जनबंधू यांच्या तक्रारीवरून 20 ते 25 हल्लेखोरांविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

यापूर्वी यश कडू तडीपारी अंतर्गत कारागृहात होता. मात्र, जेवड नगर हल्ल्यात त्याचा सहभाग असल्याचे संकेत मिळाल्याने पोलिसांनी 5 डिसेंबर रोजी त्याला पुन्हा ताब्यात घेतले. चार दिवसांची रिमांड मिळाल्याने या प्रकरणातील इतर आरोपी आणि संपूर्ण कटकारस्थान उघड करण्यास पोलिसांना मदत होणार आहे.

# पिंकी हत्याकांडातील आरोपी नितीन इंगोले निलंबित

## जलसंपदा विभागाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** - राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील फरशी स्टॉपजवळील वैभव कॉलनी येथे 30 नोव्हेंबर रोजी घडलेल्या निलिमा उर्फ पिंकी संजय खरबडे (23) हत्या प्रकरणातील आरोपी नितीन इंगोले याला निलंबित करण्यात आले आहे. जलसंपदा विभागात कनिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत असलेल्या इंगोलेवर प्रशासकीय स्तरावर तात्काळ निलंबनाची कारवाई झाली आहे.





तपासातून नितीन इंगोलेने पिंकीचा मृत्यू झाल्यानंतर पुरावे नष्ट करण्याचा कट रचल्याचे धक्कादायक माहिती समोर आली आहे. पिंकीच्या मोबाईलमधील सीडीआर तपशील, सोशल मीडियावरील संवाद आणि तिच्या हालचालींमधून दोघांमधील संबंध अधोरेखित झाले आहेत. याचदरम्यान, पिंकीचे मोबाईल सिम कार्ड व अन्य वस्तू आरोपीने नष्ट करण्याचा प्रयत्न केला असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. नितीन इंगोलेला 8 डिसेंबर रोजी न्यायालयात हजर केले जाणार आहे. पोलिस कोठडीची मुदत वाढविण्याची तयारी पोलीस विभागाने केली आहे.

# मेळघाटात आरोग्य-शिक्षणाचा प्रश्न गंभीर

## तातडीने उपाययोजना आवश्यक; स्थानिकांचे प्रशासनाला आवाहन

**महासागर | प्रतिनिधी**

**चुरणी, (दि. 7 )** मेळघाटातील आरोग्य आणि शिक्षण व्यवस्था दिवसेंदिवस ढासळत असून आदिवासी बहुल या दुर्गम क्षेत्रातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरत आहे. मूलभूत सुविधांचा अभाव, मनुष्यबळाची कमतरता आणि योजनांच्या अपुऱ्या अंमलबजावणीमुळे परिस्थिती अधिक गंभीर होत चालली आहे.

आरोग्य विभागात डॉक्टर, नर्स यांची मोठी तूट असून अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये औषधसाठा अपुरा असल्याची स्थिती स्थानिकांनी व्यक्त केली. गंभीर रुग्णांना उपचारांसाठी शेकडो किलोमीटरचा प्रवास करावा लागत असल्याने जीविताला धोका निर्माण होत आहे. कुपोषण आणि मातामृत्यू दर कमी करण्यासाठी शासन अनेक योजना राबवत असले तरी त्या जमिनीवर अपेक्षित गतीने पोहोचत नसल्याचे चित्र आहे. मेळघाटातील आरोग्य व्यवस्था सध्या सलाइनवर आहे. विशेषतः बालरोगतज्ञ आणि स्त्रीरोगतज्ञ मुख्यालयात उपस्थित नसल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यावश्यक आहे, असे प्रहार



जनशक्ती पक्षाचे चिखलदरा तालुकाध्यक्ष नरेंद्र टाले यांनी सांगितले.

शिक्षण क्षेत्राचेही तसेच हाल आहेत. शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे अनेक शाळा अपुऱ्या मनुष्यबळावर चालत असून तासिका अनियमित होत आहेत. वाडी-तांड्यातील विद्यार्थ्यांसाठी शाळेत पोहोचणेदेखील मोठे आव्हान आहे. शाळांची इमारती जीर्ण झाल्या असून पायाभूत सुविधा अत्यंत मर्यादित आहेत. भाषेची दरी, शिक्षकांची कमतरता आणि स्थानिक शिक्षकांचा अभाव ही शिक्षणघटीची मुख्य कारणे आहेत. बहुभाषिक शिक्षण सुरू करावे आणि रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी शिक्षण कार्यकर्ते राजकुमार भुसुम यांनी केली. मेळघाटातील वाढत्या समस्यांकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष न दिल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

# फुकटच्या राहुट्यांतून लाखोंची उलाढाल

## प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.7 )**- ग्रामपंचायत कारंजा बहिरम अंतर्गत सुरू होणाऱ्या बहिरम यात्रेची लगबग सुरू झाली आहे. राज्यासह इतर राज्यांतूनही मोठ्या प्रमाणात भाविक येथे येतात. मात्र यात्रेच्या परिसरात कोणतीही अधिकृत निवासव्यवस्था नसल्याने अनेक भाविक खुल्या जागांवर तात्पुरत्या राहुट्या उभारून मुक्काम करतात. या राहुट्यांचे स्वरूप एवढे मोठे असते की जणू एखादे राहते घरच! इतकेच नव्हे तर या राहुट्यांसाठी भाविकांकडून



दिवसाला पाच ते दहा हजार रुपये आकारले जात असल्याची माहिती समोर आली आहे. या व्यवहाराची कुठेही नोंद नाही, पावती नाही, किंवा अन्य लिखीत दस्तावेज नाही, संपूर्ण व्यवहार 'कॅश' मध्ये!

यात्रेच्या परिसरात उभारल्या जाणाऱ्या अशा असंख्य राहुट्यांमधून कोणताही महसूल ग्रामपंचायत किंवा प्रशासनाकडे जमा होत नाही. काहीजण या राहुट्या काही तासांसाठीही भाड्याने देत असून त्यासाठी हजारो रुपये घेतात. सोफा, दिवाण, टीव्ही, फ्रिज, पंखा-कुलर अशी आलिशान सोय पाहिल्यावर बाहेरून येणारे भाविकही मागणीनुसार पैसे देण्यास तयार होतात. मागील अनेक वर्षांपासून हा प्रकार सुरू असून प्रशासन मात्र याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याची चर्चा स्थानिकांत आहे.

### सर्व व्यवहार अनधिकृत

राहुट्या उभारण्यासाठी खर्च येतो हे खरे; परंतु त्यासाठी आकारले जाणारे अतोनात दर आणि अनधिकृत व्यवहार यावर प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दरम्यान, बहिरम यात्रेत या राहुट्यांमधून लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याचे स्पष्टपणे दिसत असून तरीही सर्वच यंत्रणा याकडे हात झटकून बसल्याची भावना व्यक्त होत आहे.

### मनोरंजन कर आकारणी गरजेची

यातही काही विशेष 'व्हीआयपी राहुट्या' यात्राभर तशाच उभ्या राहतात. या राहुट्यांतून लाखोंची उलाढाल होत असली तरी त्यांची कोणतीही अधिकृत नोंद नसल्याचे दिसून येते. ग्रामपंचायत तसेच पंचायत समिती चांदूरबाजार आणि अमरावती जिल्हा परिषद यांनी या राहुट्यांवर मनोरंजन कर लावणे अथवा त्यांची कायदेशीर नोंदणी करणे आवश्यक असल्याची मागणी व्यक्त होत आहे.

# निवडणुकांचा पोरखेळ

राज्यकर्त्यांची अनिच्छा आणि न्यायालयात तारीख पे तारीख अशा चक्रात गेली आठ दहा वर्षे सापडलेल्या महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकतीस जानेवारी २०२६ पूर्वी घेण्यात याव्यात असा बडगा सर्वोच्च न्यायालयाने उगारल्यानंतर २२२ नगर परिषदा व ४२ नगर पंचायती यांच्या निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडला. निवडणूक प्रक्रियेतील घोळ, त्रुटींवर पुन्हा न्यायालयाने ताशेरे मारल्यानंतर जवळपास वीस नगर परिषदांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या, आता तेथे वीस डिसेंबरला मतदान होईल आणि राज्यातील सर्व नगर परिषदांच्या व नगर पंचायतींच्या निवडणुकींची मतमोजणी एकवीस डिसेंबरला होईल. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर गेल्या पासष्ट वर्षात नगर परिषद व नगर पंचायतींच्या निवडणुका एवढ्या कधी गाजल्या नव्हत्या. राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि राज्याच्या मंत्र्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एवढा कधी रस घेतला नव्हता. पैशाचा पाऊस एवढा कधी पडला नसावा. साड्या वाटपाची चर्चा एवढी कधी झाली नसावी. दरमहा पंधराशे रूपये देतोय ना मग मतदान आम्हालाच करा असे यापुर्वी लाडक्या बहिणींना वारंवार कोणी बजावून सांगितले नव्हते. नगर परिषदा व नगर पंचायतीच्या निवडणूक प्रचारासाठी खाजगी विमाने व हेलिकॉप्टरचा एवढा कधी वापर झाला नव्हता. विधानसभा निवडणुकीप्रमाणे भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या तिन्ही पक्षांनी या निवडणुका लढवल्या. सरकारमधे नंबर एक कोण आणि नंबर दोन कोण, आजी कोण नि माजी कोण, फाईलीवर पहिली स्वाक्षरी कोणाची व नंतर मंजुरी कोण देतो अशीही महायुतीच्या मंत्र्यांनी व आमदारांनी जनतेपुढे फुशारकी मारावी हे सर्व लाजीरवाणे होते. प्रसिध्दीचा सर्वात जास्त फोकस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर दिसला. शिवसेना आमदार निलेश राणे यांनी सिंधुदूर्ग जिल्ह्यात भाजपाच्या पदाधिकाऱ्याच्या घरात स्टिंग ऑपरेशन करून पैशाच्या थैल्यांचे दर्शन संपूर्ण महाराष्ट्राला घडवले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यावर अन्य पक्षातील कार्यकर्त्यांची फोडाफोडी व पैशाच्या थैल्यांच्या वाटपाचे गंभीर आरोप झाले. अजितदादांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे व शरद पवारांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत सावंत हे कुठे होते हे शोधावे लागत होते. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांचा प्रसिध्दी पत्रकांवरच भर असावा.

या निवडणुकीत महायुतीतच रणधुमाळी बघायला मिळाली. सत्ताधारी पक्षांतच परस्परांवर कुरघोडी आणि एकमेकांची खेचाखेची याचे दर्शन रोज घडत होते. शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, प्रकाश आंबेडकर हे फारसे कुठे दिसलेच नाहीत. ठाकरेंची शिवसेना व पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्यात मोठी तोड फोड झाल्यानंतर अगोदर एकनाथ शिंदे व नंतर देवेंद्र फडणवीस असे दोन मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्रातील राजकारणाची संभाव्य दिशा कशी असेल याचे संकेत नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकीतील प्रचाराने दिले.

विधानसभा निवडणुकीत राज्यात भाजपाचे सर्वात जास्त १३२ आमदार निवडून आले. नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकीतही भाजपाला सर्वत्र नंबर एक स्थान मिळवायचे आहे. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही मित्र पक्ष या सत्ता स्पर्धेत आहेत. निवडणूक पूर्व पाहणीनुसार भाजपाचे १७५ नगराध्यक्ष निवडून येतील. तसे झाले तर काँग्रेस व शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसेल आणि एकनाथ शिंदे व अजित पवारांना भाजपापुढे नमती भूमिका घ्यावी लागेल.



महाराष्ट्रनामा
सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

भाजपाच्या अजेंडावर आज टार्गेट म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वरच्या क्रमांकावर आहेत. त्यांना पुन्हा मुख्यमंत्रीपदाची जबर महत्वाकांक्षा आहे. त्यांनी सुरू केलेल्या लाडकी बहिण योजनेमुळेच महायुतीला सत्ता मिळवून दिली असे ते वारंवार सांगत असतात. त्यांनी ठाकरेंच्या शिवसेनेत बंड केल्यामुळेच उद्धव ठाकरे यांना पायउतार व्हावे लागले व महाघाडीचे सरकार कोसळले. राज्यात भाजपा सत्तेवर आली व फडणवीस मुख्यमंत्री झाले ते शिंदेंच्या धाडसी निर्णयामुळे. पण भाजपाच्या भरभक्कम पाठिंब्यामुळेच शिंदे मुख्यमंत्री झाले, हे कसे विसरता येईल. भाजपाच्या संरक्षक कवचामुळेच मुंबई, सुरत , गुवाहटी, गोवा अशी चाळीस आमदारांसह पंचतारांकीत सफर झाली. शिवसेना हा पक्ष व धनुष्य बाण भाजपामुळेच मिळाला, हे शिंदे यांनी विसरू नये असे भाजपाला वाटते. दोन मोठे पक्ष फोडल्यानंतर शरद पवार व उद्धव ठाकरे हे कमकुवत झाले आहेत. भाजपाने ज्यांच्यावर गंभीर आरोप करून जेलमधे पाठविण्याची भाषा केली ते आता सरकारमधे मंत्री आहेत. आता एकनाथ शिंदे व अजित पवार यांची भाजपाच्या दृष्टीने गरज संपली आहे, त्यांचे माघारीचे दोर कापले आहेत. ते सत्ता सोडून जाऊ शकत नाहीत. गरज म्हणून आणखी काही काळ त्यांना बरोबर ठेऊन राज्याच्या ग्रामीण भागात पक्षाचा विस्तार कसा करता येईल , स्थानिक स्वराज्य संस्थांमधे पक्षाचा पाया भक्कम कसा करता येईल यावर भाजपाने सारे लक्ष्य केंद्रीत केले आहे. म्हणूनच देवाभाऊ नंबर १ आहेत, देवाभाऊ हेच सर्वेसर्वा आहेत, तिजोरीची चावी त्यांच्याकडे (अजितदादा) असली तरी तिजोरीचे मालक आमच्याकडे आहेत, असा प्रचार नगर परिषद व नगर पंचायत निवडणूक प्रचारात भाजपाने केला.

ठाणे, कल्याण–डोंबिवली, तसेच सिंधुदूर्ग, रत्नागिरी येथे एकनाथ शिंदेंच्या पक्षाचे नेटवर्क मोडून काढण्याची जबाबदारी भाजपाने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व मंत्री गणेश नाईक यांच्यावर दिली आहे. हे दोघेही ठाणे जिल्ह्यातील आहेत, त्यांना शिंदेंची पाळेमुळे ठाऊक आहेत. शिंदे यांच्या पक्षातील अनेक लहान मोठे मासे त्यांनी आपल्या गळाला लावले आहेत. आमची माणसे फोडतात व भाजपात घेतात म्हणून एकनाथ शिंदे यांनी अमितभाई शहांकडे तक्रारी केल्या पण त्याचा उपयोग झाला नाही. आपली माणसे आपणच संभाळली पाहिजेत हे शिंदे यांना कळून चुकले आहे. डहाणूतील एका सभेत एकनाथ शिंदे म्हणाले– एकाधिकारशाहीच्या विरोधात आपण एकत्र आलात, रावणाची लंका जळून खाक झाली, ती अहंकारामुळेच ते रावण कोणाला म्हणाले, लंका जाळायची म्हणजे कोणाला धडा शिकवायचा हे त्यांनी सांगितले नाही. नंतर देवेंद्र फडणवीस पालघरमधे म्हणाले– आपण रामाचे सैनिक आहोत, आपण लंकेत राहत नाही, आपण रावण नाही, आपला उमेदवार भरत हा रामाचा भाऊ आहे.

मंत्री दादा भुसे म्हणतात– जनतेच्या मनातील मुख्यमंत्री कोण असे विचारले तर लोक म्हणतात– एकनाथ शिंदे


दुसरे मंत्री माणिकराव कोकोटे म्हणातात– भाजपा हा पूर्ण बरबटलेला पक्ष आहे. फोडाफोडीत भाजपा नेत्यांचे आयुष्य गेले

प्रदेशाध्यक्ष रवीद्र चव्हाण यांच्या दोन विधानांनी महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले आहे. भाजपाला आता कुणा मित्र पक्षांची गरज नाही, हाच त्यांचा इशारा आहे. अमित शहा मुंबईत आले असताना म्हणाले आता स्वबळावर लढायचे, शतप्रतिशत हे आपले ध्येय आहे, भाजपाला कुणा कुबड्यांची गरज नाही निलेश राणे यांनी जेव्हा रवींद्र चव्हाण यांचे नाव घेऊन त्यांच्यावर पैसे वाटपाचा आरोप केला तेव्हा चव्हाण म्हणाले– मला दोन डिसेंबर पर्यंत युती टिकवायची आहे नंतर म्हणाले– जो भी है, देवाभाऊ है.. नंबर दोन ला काही अर्थ नसतो. नगर परिषदा व नगर पंचायतींच्या निवडणुकीत विरोधी पक्ष दिसला नाही, भाजपा विरूध्द एकनाथ शिंदे व अजितदादा पवार असा संघर्ष दिसून आला. भाजपाच्या बलाढ्य यंत्रणेपुढे एकनाथ शिंदे सर्व शक्ति एकवटून लढताना दिसले. या निवडणुकीत जनतेच्या समस्या, लहान शहरातील प्रश्नांची चर्चा झाली नाही, विकासाचा मुद्दा नाही, साम दाम दंड भेद अशी रणनिती राबवली गेली. नेत्यांच्या निकटवर्तीयांना बिनविरोध निवडून आणण्यासाठी सर्वस्व पणाला लावले गेले. नगर परिषद व नगर पंचायत पातळीवर भाजपाची नवीन घराणेशाही उदयाला आली. पैसे, पार्ट्या, बोगस मतदान, हाणामारी, दगडफेक, चाकू, पिस्तुल, धमकी, सर्व साधनांचा मुक्त वापर झाला. समोर कोणी विरोधक असता कामा नये या तत्वानुसार निवडणुका लढवल्या गेल्या.

# भारत रशिया दृढ मैत्री



रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांचा दोन दिवसांचा ऐतिहासिक भारत दौरा नुकताच पार पडला. पुतिन यांच्या या भारत दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. युक्रेन रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर आणि अमेरिका – भारत यांचे संबंध दुरावल्यानंतर पुतिन यांचा हा पहिलाच दौरा असल्याचे या दौऱ्याकडे अमेरिकेसह संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. पुतिन यांच्या या दौऱ्याकडे अमेरिकेचे विशेष लक्ष होते मागील काही महिन्यांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली. सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही. भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला होता अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला त्याचाच परिपाक म्हणजे पुतिन यांचा भारत दौरा. पुतिन यांनी भारताचा दौरा करून दोन्ही देशातील मैत्रीचे संबंध दृढ असल्याचेच सिद्ध केले. या दौऱ्यात दोन्ही देशांदरम्यान महत्वाचे करार करण्यात आले. पुतिन भारत दौऱ्यावर आता आले असले तरी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन हे फोनवरून सातत्याने एकमेकांशी संवाद साधून चर्चा करतच होते. ऑगस्ट महिन्यात भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ती भेट झाली होती. एस जयशंकर यांनी त्या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली त्या भेटीत अनेक विषयावर चर्चा केली मात्र त्या भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. त्या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पर्दापाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला होता. अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली. विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो. भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन समोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे. अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे. रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली. आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रमही कारणीभूत होते शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र पुन्हा एकत्र आले आहेत. रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. या दोन्ही महासत्ता पुन्हा एकत्र आल्या तर त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात. अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली होती. त्यांनी म्हटले होते की ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे. ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे. पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे. पुतिन यांच्या भारत दौऱ्यानंतर भारत रशिया या दोन जुन्या मित्रांमधील मैत्रीचे संबंध दृढ झाले आहेत हे मात्र नक्की.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# सिंहस्थ कुंभमेळासाठी साधुग्राम अवश्य उभारा; परंतु एकाही झाडाची हत्या होणार नाही याचीही खबरदारी सरकारने घ्यावी

नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा ३१ आक्टोंबर २०२६ ला सुरू होणार असून २४ जुलै २०२८ पर्यंत चालेल ही आनंदाची गोष्ट आहे.याचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे आणि व्हायलाच पाहिजे.परंतु कोणताही कार्यक्रम आखतांना पर्यावरणाला विशेष महत्त्व देणे अत्यंत गरजेचे आहे.कारण आपल्या सुख–सुविधांसाठी पर्यावरणाचा ह्रास देवीदेवता किंवा पर्यावरणवादी सहन करणार नाही.सरकारने विकासाबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज आहे.पर्यावरण वाचले तरच पुढची पिढी, निसर्ग,पशुपक्षी,औषधीयुक्त वनस्पती,जीवजंतू सुरक्षित राहील याची जाण सरकारने ठेवली पाहिजे.साधुग्रामसाठी सरकार वृक्ष तोडीबद्दल राजकारण होत असल्याचे माननीय मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस म्हणतात, परंतु यात तथ्य नाही.कारण जशे–जशे वृक्ष कटाई होत राहिल तशे–तशे सर्वांचेच आयुष्य कमी–कमी होत जाईल ही बाब मुख्यमंत्र्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. वृक्षतोड म्हणजेच मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांचे आयुष्य दिवसेंदिवस कमीकमी होणे होय.त्यामुळे वृक्षतोडीला राजकीय उपमा देणे मुख्यमंत्र्यांना शोभत नाही.वृक्ष हे पृथ्वीचा,निसर्गाचा, पर्यटनाचा,मानव–पशुपक्षी–संपुर्ण जीवजंतू यांचा आत्मा आहे. आम्हीही सनातनवादी व हिंदू आहोत.परंतु जो निसर्ग प्राणवायू देतो आणि लाखोंचे प्राण वाचवितो अशा झाडांची कत्तल वर्षभराच्या कार्यक्रमासाठी तब्बल १८०० पेक्षा अधिक मोठमोठ्या झाडांची कटाई करने म्हणजे ही हत्या नाही तर काय ? मुख्यमंत्री म्हणतात की प्रमागराज येथे कुंभमेळ्यासाठी तब्बल १५ हजार हेक्टर जमीन उपलब्ध होती याचे स्वागतच ती जमीन बंजार असावी किंवा तिथे झाडे नसावेत.कारण उत्तरप्रदेश १५ हजार हेक्टर मधील झाडांच्या कटायीची कोणतीही घटना सामोरं आलेली नाही आणि आपण प्रयागराजची तुलना नाशिकशी का करावी ?मुख्यमंत्री म्हणतात की प्रमागराज कुंभमेळाव्याच्या तुलनेत नाशिक येथे साधुग्रामसाठी केवळ ३५० एकर जमीन आहे.माननीय मुख्यमंत्री महोदय ३५० एकर म्हणजे कमी जागा झाली काय ?ही आपली व सरकारची जबाबदारी आहे की ३५० एकरमधील एकही वृक्ष कटायला नकोच. कारण नाशिक ही राज्यासह देशासाठी पावण भुमि आहे सोबतच देशाचे मोठे पर्यटन स्थळ सुध्दा आहे.देश–विदेशातील नागरिक व पर्यटक देवदर्शनासाठी अवश्य येतातच यात दुमत नाही.मुख्यत्वेकरून तपोवनाचा आनंद घेऊन स्वतःला धन्य मानतात.कारण तपोवनात भगवान राम,लक्ष्मण व सीता याची पावन भुमि असल्याने साक्षात भगवान राम यांचे साक्षात दर्शन झाल्याचा भास सर्वांनाच होतो.त्यामुळे सरकारने कोणतेही चुकीचे पाऊल न उचलता साधुग्रामसाठी योग्य ती जागा उपलब्ध करावी.कारण झाडे वाचली तरच पुढची पिढी सुरक्षित राहील अन्यथा झाडांसोबतच मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूंचा ह्यास झाल्याशिवाय रहाणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे तपोवनातील एकही झाड न तोडता साधुग्राम उभारत असेल तर त्याचे स्वागत सर्वच स्तरातून होईल.मी सरकारला एक सुचणा देतो की वृक्ष तोडीच्या विरोधात सामाजिक संघटना, नाशिककर, राजकीय पक्ष, अभिनेता सामोरं येतं असेल तर याचे स्वागत सरकारने सुध्दा करावे कारण आपण पहिलेच प्रदुषणाने गुदमरत आहोत याची जाण सरकारने ठेवाली पाहिजे.झाड तोडणीसाठी मुजोरी करून चालणार नाही.आवश्यकता असेल तर झाडांच्या फांद्यांची छाटणी अवश्य करावी.सरकाने तपोवनातील वृक्षतोडीचा प्रश्न सौहार्दपूर्ण पध्दतीने हाताळला पाहिजे आणि पर्यावरण, निसर्ग, पर्यटन,पर्यटक यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाणार नाही याचीही खात्री केली पाहिजे.मंत्री नितेश राणे पर्यावरणाची तुलना ईदच्या बकरी कापण्याशी करून वादग्रस्त वक्तव्य करतात ही हास्यास्पद बाब आहे .राणे साहेब ईद हा वेगळा मुद्दा झाला यांच्याशी आणि पर्यावरणाशी काहीही संबंध नाही.अहो राणे साहेब १८०० झाडांची कत्तल म्हणजे १८ लाख लोकांचा,पशुपक्षांचा व जीवजंतूची श्वास कोंडून हत्याच ना! याचा आपण विचार का करीत नाही.आम्हाला राजकारण नकोच फक्त पर्यावरण सुरक्षित रहावे,पृथ्वीचे संतुलन सुरक्षित असावे, सर्वांना शुद्ध हवा मिळावी, पर्यटकांना तपोवनाचा आनंद मिळावा हाच आमचा पर्यावरणवाद्यांचा व जनतेचा खरा उद्देश आहे.नाशिक मनपा प्रशासनाच्या व सरकारच्या निर्णयाचा साधू–महंतांनी कडाडून विरोध करायला हवा.कारण साधू–महंतांचे वास्तव मुख्यत्वे करून हे वृक्षांच्या



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

सानिध्यात असते आणि असायलाच पाहिजे.नाशिकच्या तपोवनाचा इतिहास रामायणाशी सुध्दा जुळला आहे.याच तपोवनात भगवान राम,सीता आणि लक्ष्मण यांनी त्यांच्या १४ वर्षाच्या वनवासातील बराचसा काळ याठिकाणी घालवीला होता. त्यामुळे हे पावण स्थळ राज्यासाठीच नाही तर देशासाठी व जगासाठी ऐतिहासिक स्थळ मानल्या जाते.त्याचप्रमाणे याच स्थळी लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक कापले होते असेही सांगितले जाते.आपण रामराज्य प्रस्थापित करण्यासाठी अयोध्येत भव्य राममंदिर उभारले ही देशासाठी ऐतिहासिक आणि गौरवशाली बाब आहे.परंतु ज्या तपोवनात भगवान राम, सीता आणि लक्ष्मण यांचा सहवास होता आणि लक्ष्मणाने ज्या ठिकाणी शूर्पणखेचे नाक कापले अशा ऐतिहासिक आणि पौराणिक वास्तव्याला जर सरकार १८०० वृक्ष कापून काडीमोड करून नेस्तनाबूत करीत असेल तर ही कसली रामराज्याची कल्पना म्हणावी! तपोवनातील एक जरी वृक्ष कटत असेल तर हा मानवजातीवर,पशूपक्षांवर,निसर्गावर, पौराणिक कथांवर व देशातील जनतेच्या भावनांवर मोठा प्रहार समजल्या जाईल. आपण जेव्हा रामराज्याची कल्पना करतो तेव्हा सर्वच बाजूंचा विचार सरकारने केला पाहिजे.प्रश्न रहाला साधू महंतांच्या वास्तव्याचा यासाठी अनेक पर्यायी व्यवस्था सरकार जवळ आहेत.पटांगत, ग्राउंड,शासकीय कॉटेजेस,धर्मशाळा, राजकीय पुढाऱ्यांचे फॉर्म हाऊस व त्यांची शेत जमीन असे अनेक पर्याय आहेत.परंतु साधू महंतांच्या वास्तव्यासाठी तपोवनातील १८०० पेक्षा जास्त वृक्षांची हत्या करून साधूग्राम तयार करने म्हणजे निसर्गाची खुली हत्याच !आज आपण पहात आहोत की, देशासह जगात बदलत्या हवामानामुळे महाप्रलय, सुनामी, भुकंप,अती पाऊस,अती उष्णता यासारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे आणि हा संपूर्ण प्रकार जंगल कटाई व वृक्षतोडीमुळे होत आहे ही बाब सर्वांच्या डोळ्यासमोर आहे तरीही नाशिकमधील ऐतिहासिक तपोवनातील वृक्षांची कत्तल करण्यासाठी सरकार हिरवी झेंडी देत ही अत्यंत दुर्भाग्य पुर्ण बाब आहे.ही अशी गोष्ट झाली की आ बैल मुझे मार. सरकार सांगते की झाडे लावा,झाडे जगवा आणि स्वतः तब्बल १८०० झाडांची कत्तल करायची हा कुठला न्याय म्हणावा !आज एक वृक्ष लावले तर त्याला मोठे व्हायला ५ ते १० वर्षे लागतात आणि नाशिक मनपा प्रशासन व सरकार एकाच वेळेस १८०० वृक्ष कापण्याचा आदेश देत आहे ही फक्त नाशिकलाच नाही तर देशाला घातक सिद्ध होवू शकते.आज देशातील व राज्यातील वृक्षतोडीमुळे प्रदुषणाच्या बाबतीत भारत अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत आहे.जगातील टॉप १०० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ६५ शहरे एकट्या भारतातील आहेत.यात मुख्यत्वे करून दरभंगा, आसोपूर, पाटणा,नवी दिल्ली, कोलकाता, मुंबई,हैद्राबाद,बंगळूरु, चेन्नई यांचा समावेश आहे आणि आता नागपूर सुध्दा प्रदुषणाच्या छायेत आहे.त्यामुळे प्रदूषणाच्या बाबतीत भारताची चिंता दिवसेंदिवस वाढतच आहे.वाढत्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलकटाई, सांडपाणी, मोठ्या प्रमाणात वाहनांचे आवागमन, हवाई वाहतूक इत्यादींमुळे आज पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण झालाआहे.तपोवनातील एकही वृक्ष कटणार नाही याची जबाबदारी सर्वप्रथम मनपा प्रशासनने व सरकारने घेतली पाहिजे.नाशिककर, निसर्गप्रेमी,समाजसेवी संघटना, अनेक राजकीय पक्ष तपोवनातील वृक्ष तोडीच्या विरोधात उभे ठाकले आहे आणि आता या आंदोलनाला मोठे बळ वृक्षप्रेमी अभिनेते सयाजी शिंदे यांच्यामुळे मिळाले आहे ही स्वागतार्ह बाब आहे. सरकारने वृक्ष लावणे शिकावे व वृक्ष तोडणे टाळावे.आज राज्यातील प्रत्येक शहरापासून ३० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण झालेले आहे.यामुळे लाखोंच्या संख्येने झाडांची खुलेआम कत्तल सरकारने केली आणि याचे प्रायश्चित्त राज्याच्या जनतेला प्रदुषणाच्या माध्यमातून भोगावे लागत आहेत.त्याचप्रमाणे अनेक हिंसक पशु शहराकडे धाव घेत आहेत हा सर्व प्रकार वृक्षतोडीमुळे निर्माण झाला आहे. झाडांच्या कत्तलमूळे दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी–कमी होत आहे याचे भान सरकारने ठेवले पाहिजे. नाशिक मनपा प्रशासन व सरकार आपण जर चुकीचे पाऊल उचलले तर याचे गंभीर परिणाम राज्याला भोगावे लागतील. सरकारने नाशिककरांच्या भावनांचा,पौराणिक कथांचे वास्तव,निसर्गाची ढासळती परिस्थिती,बदलते हवामान, पर्यटक,पर्यटन या संपूर्ण बाबींचा गांभीर्याने विचार करावा आणि तपोवनातील झाडांच्या कत्तलीचा निर्णय ताबडतोब मागे घ्यावा अन्यथा याचे गंभीर परिणाम पुढच्या पिढीला भोगावे लागतील.झाडे वाचली तरच पुढची संपूर्ण पिढी सुरक्षित राहील.जय हिंद.

# बोधी दिन: मानवजागृती आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग

जगाच्या इतिहासात काही दिवस फक्त प्रसंग म्हणून नाही तर बदलांचे बिंदू म्हणून ओळखले जातात. अशा दिवसांपैकी एक म्हणजे ८ डिसेंबर बोधी दिन होय. हा दिवस केवळ बौद्ध धर्मीयांसाठी अध्यात्मिक महत्त्वाचा नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी विचार, विवेक, करुणा आणि सामाजिक न्यायाची स्मृती जागवणारा दिवस आहे. कारण याच दिवशी राजकुमार सिद्धार्थांनी बोधी वृक्षाखाली ध्यानधारणा करत करत जीवनातील अनंत दुःख, विषमता, युद्ध, सत्ता, लोभ व अन्यायाच्या संकटांचे मूळ शोधत अखेर ज्ञानप्राप्ती केली आणि ते गौतम बुद्ध झाले. म्हणूनच बोधी दिन ही केवळ धार्मिक घटना नाही, तर मानवजातीच्या सामाजिक, नैतिक, तत्त्वज्ञानिक आणि मानवतावादी प्रवासातील एक अविस्मरणीय मैलाचा दगड आहे.

मानव समाजाच्या उत्क्रांतीत अनेकदा युद्धांनी, एकाधिकारशाहीने, साम्राज्यवादाने आणि सामाजिक जात–धर्म–वंशभेदांनी दहशत निर्माण केली. आपल्याला प्रश्न असा पडतो की मानवाला मानव बनविणारा मार्ग कोणता? शक्तीचा की प्रज्ञेचा? तर बुद्धांचे उत्तर होते की शांततेचा, नैतिकतेचा, करुणेचा, समानतेचा आणि मध्यममार्गाचा. म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता बोधी दिन हा केवळ आध्यात्मिक ज्ञानाचा उत्सव नाही तर मानवी समाजाला न्याय्य, समतामूलक आणि नैतिक दिशेने प्रवास करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.


इतिहासात पाहिल्यास, ज्ञानप्राप्तीपूर्वीचा सिद्धार्थ हा केवळ एखाद्या राज्यातील राजकुमार नव्हता; तो एक संवेदनशील निरीक्षक होता. मृत्यू, रोग, वृध्दत्व आणि दारिद्र्य या चार सत्यांनी त्याला हादरवले. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून हे प्रश्न आजही तेवढेच जिवंत आहेत. जग प्रगत झाले असे म्हणवले जाते, पण भूक, युद्ध, सामाजिक असमानता, मानसिक तणाव, जातीय संघर्ष, धार्मिक कट्टरता आणि उपभोगवाद–नफा–आधारित जीवनपद्धतीने मानवाला पुन्हा असहाय्य बनवले आहे. अशा काळात बोधी दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

गौतम बुद्धांच्या शिकवणीत धम्म हा कर्तव्य, नैतिकता आणि विवेक होता. त्यामुळे धम्म म्हणजे कर्मकांड, जप–तप, पुरोहिती किंवा अंधश्रद्धा नव्हे, तर समाजाला समता आणि न्याय मिळवून देणारी प्रेरणा. म्हणूनच बुद्ध म्हणतात की अप्प दीपो भव म्हणजेच स्वतःचा दीप स्वतः बना. समाजशास्त्रीय अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीने आत्मबोध, विचारमंथन आणि नैतिक धैर्य विकसित केले पाहिजे; कारण परिवर्तन हे बाहेरून लादले जाणारे नसते तर ते अंतर्मनातून जन्मते.

बोधी दिन मानव स्वभावातील तीन प्रमुख प्रवृत्तींकडे निर्देश करतो, त्यामध्ये पहिली प्रवृत्ती म्हणजे लोभ म्हणजेच अत्यंत मिळवण्याची इच्छा होय. आधुनिक समाजशास्त्र सांगते की बाजारव्यवस्था भौतिक समाधान देऊ शकते, पण ती आध्यात्मिक आणि भावनिक शांती देऊ शकत नाही. दुसरी प्रवृत्ती आहे द्वेष होय. आजही आपण पाहतो की राजकारणात, धर्मांमध्ये, समाजवर्गांमध्ये, डिजिटल माध्यमात आणि राष्ट्रांमध्ये लोकांमध्ये मतभेदांपेक्षा तिरस्कार वाढत आहे. बुद्ध म्हणतात की द्वेषाने द्वेष संपत नाही; प्रेमानेच तो संपतो. तिसरी प्रवृत्ती म्हणजे अज्ञान होय. दडपशाही, भेदभाव, हिंसा आणि कट्टरतेचा मूलाधार. समाजातील अन्याय, जातीय दमन, पितृसत्ता, वर्ण–जातिवाद, आर्थिक शोषण, पर्यावरणाचा विनाश यांची मुळे मानवी अज्ञानात आणि अविचारी कृतीत आहेत. बोधी म्हणजे हे अज्ञान दूर करण्याची प्रक्रिया होय.

म्हणूनच बोधी दिन मानवाला स्मरण करून देतो की ज्ञान म्हणजे माहिती नव्हे, तर जागृती. आज इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, जागतिकीकरण आणि डिजिटल संपर्कामुळे माहितीचे जग फुलले आहे; पण शांती, श्रद्धा, मानवता आणि संयम कोठेतरी हरवले आहेत. म्हणूनच बुद्धांचे तत्त्वज्ञान समाजशास्त्रीय प्रश्न विचारते की आपण अधिक प्रगत झालो आहोत, की फक्त अधिक गुंतागुंतीचे आणि अस्थिर झालोआहोत?

बोधी दिन आपल्याला न्यायाच्या, समतेच्या, संवादाच्या आणि अहिंसेच्या नव्या मूल्यांना स्वीकारण्याचे आह्वान देतो. बुद्धांनी लोकशाहीचा पाया मांडताना संघ, विचारस्वातंत्र्य, मतभेदांचा सन्मान आणि सार्वत्रिक करुणा या तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवले. आजच्या लोकशाही व्यवस्थेत या मूल्यांची पुन्हा गरज भासते. कारण विचारविनिमयाऐवजी संघर्ष, सहिष्णुतेऐवजी कट्टरता आणि मानवी हक्कांऐवजी नियंत्रणवाद वाढताना दिसतो आहे. म्हणूनच बोधी दिन आपल्याला सांगतो की समाजाची उभारणी वर्चस्वावर नाही, तर सहजीवनावर होते.



डॉ. राजेंद्र बगाटे
मो. ९९६०१०३५८२,
ईमेल :
bagate.rajendra5@gmail.com

याच संदर्भात बुद्धांनी समाजातील सर्वात उपेक्षित घटक म्हणजेच महिला, शूद्र, वंचित, संघर्षग्रस्त आणि पीडित घटकांमध्ये मानवी समानतेचे तत्त्व पहिल्यांदा प्रत्यक्षात आणले. समाजातील प्रत्येक जण जात, लिंग, वर्ग, धर्म, व्यवसाय किंवा जन्माच्या आधारे समान आहे हे तत्त्व सामाजिक न्यायासाठी आजही महत्त्वाचे आहे.

बोधी दिन हा वर्तमानातील मानसिक आरोग्याच्या संकटांनाही उत्तर देतो. आधुनिक जीवनशैली वेगवान, स्पर्धात्मक, तणावग्रस्त आणि यांत्रिक झाली आहे. बुद्धांचे ध्यान, सम्यक स्मृती, मन:शांतता आणि प्रज्ञेचे तत्त्व आज जागतिक मानसिक आरोग्य चळवळीचे आधार आहे. जागरूकता, ध्यान, भावनिक बुद्धिमत्ता (, , ) यांचा उगम हा बोधीच्या तत्त्वज्ञानातच आहे.

बोधी दिन आपल्याला पर्यावरणीय जाणीव देखील शिकवतो. बुद्धांनी निसर्गासोबत संघर्ष नव्हे, तर सह–अस्तित्व सुचवले. आज पृथ्वीला हवामान बदल, प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास, नद्यांचा मृत्यू, जंगलांचा विनाश आणि प्राणी–मानव संघर्ष या समस्या भेडसावत आहेत. अशावेळी सर्व प्राणी माझेच आहेत हा बुद्धांचा संदेश आजच्या पर्यावरणीय नैतिकतेचा मूळ पाया ठरतो. याच अर्थाने बोधी दिन हा केवळ स्मरणदिन नाही तर तो सततच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. बुद्धांनी सांगितले की मनुष्याचे दुःख भाग्याने नव्हे, तर त्याच्या विचारांनी आणि कृतींनी निर्माण होते. म्हणून बदल हवा असेल तर तो आतून सुरू झाला पाहिजे.

आजच्या काळात बोधी दिनाचा संदेश जगभराला एका नव्या सामाजिक कराराची गरज सांगतो तो संदेश म्हणजे, जिथे धर्म हिंसा नव्हे, संवाद निर्माण करतो. जिथे तंत्रज्ञान मानवतेची परिपूर्ती करतो. जिथे समीक्षाशील विचार आणि करुणा एकत्र येतात. जिथे समाज फक्त विकसित नसतो, तर मनानेही सभ्य असतो. या अर्थाने बोधी ही स्वतःमध्ये एक अंतरिक क्रांती आहे. ती जीवनाच्या संघर्षांना टाळणारी नाही, तर त्या संघर्षांचे स्वरूप समजून शांततेने त्यावर उत्तर शोधणारी आहे. बोधी दिन ही एक जाणीव आहे की जग बदलण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे स्वतःला बदलणे होय.

आज ८ डिसेंबरच्या या दिवशी आपण सर्वांनी स्वतःला विचारावे की आपण जागृत आहोत की फक्त जागे आहोत?

कारण बुद्धांच्या मते, मनुष्य जन्माला येतो, पण मानव बनण्यासाठी त्याला विवेक, करुणा, दया आणि समता अंगीकारावी लागते. बोधी दिन आपल्याला एकच संदेश देतो की, शांती ही बाह्य मिळकत नाही; ती अंतर्मनातून उगम पावलेली प्रज्ञा आहे. आणि हीच प्रज्ञा समाजाला न्याय्य, समतामूलक, शोषणमुक्त आणि सौहार्दपूर्ण बनवू शकते. म्हणून आजच्या या पवित्र दिवशी आपण फक्त स्मरण नव्हे तर अनुकरण करण्याचा संकल्प करूया. कारण जेव्हा प्रत्येक मानव बोधी होईल, तेव्हा जगात खऱ्या अर्थाने सुंदरता, शांती आणि मानवता नांदेल.

## अशोकायन...

### दिव्यांगांचे मनोगत

अरे डोळस बांधवांनो
दिव्यांगांच्या समस्याची
ठेवा थोडी जाणिव
बंद डोळ्यांनी चालुन पहा
समजेल तुम्हाला उणिव . .

दिवस असो की रात्र
आम्हाला काय त्याचे ?
परावलंबी जीवन
प्रारब्ध असे आमचे . .

बंधुत्वाची ठेवूनी जाण
नोकरीत द्या आम्हा स्थान
परावलंबित्व कमी करण्या
घ्या ना तुम्ही पुढाकार !



प्रा.अशोक सारडा मेहकर
(९४२२३९४३३९)

# अदाणी विद्यापीठाच्या पदवीधरांनी देशाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे : डॉ. प्रीती अदाणी यांचे आवाहन





**अहमदाबाद, ६ डिसेंबर :** अदाणी विद्यापीठाचा दुसरा दीक्षांत समारंभ शनिवारी शांतीग्राम येथील विद्यापीठाच्या सभागृहात मोठ्या उत्साहात झाला. या समारंभात ८७ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली, ज्यामध्ये तीन गुणवंत पदक विजेतेही होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांचे कुटुंबीय, शिक्षकवर्ग, संचालन मंडळाचे सदस्य, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि विशेष पाहुणे उपस्थित होते.

या समारंभात ७९ एमबीए (इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट) पदवीधर आणि ८ एम.टेक (कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट) पदवीधर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. समारंभाचे अध्यक्षस्थान अदाणी विद्यापीठाच्या अध्यक्षा आणि अदाणी फाउंडेशनच्या चेअरपर्सन डॉ. प्रीती जी. अदाणी यांनी भूषवले.

आपल्या भाषणात डॉ. अदाणी यांनी भारतातील पायाभूत सुविधा आणि विकासाच्या क्षेत्रात होत असलेल्या मोठ्या बदलांकडे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की डिजिटल परिवर्तन, शाश्वत विकास आणि लोककेंद्रित व्यवस्था आता देशाच्या प्रगतीचे मुख्य आधार बनत आहेत.

त्यांनी सांगितले की, पायाभूत सुविधा शेवटी समाजाच्या सेवेसाठीच असायला हव्यात. फक्त कनेक्टिव्हिटी आणि सुविधा निर्माण करणे पुरेसे नाही, तर लोकांना अधिक चांगले आरोग्य, सुरक्षितता आणि संधी मिळतील अशी व्यवस्था तयार करणे ही आपली मोठी जबाबदारी आहे. प्रगतीची मोजणी आता फक्त वेग, प्रमाण किंवा कार्यक्षमतेने नाही होणार, तर आपल्या नागरिकांचे जीवन किती सुधारले आहे यावर होणार आहे. त्या पुढे म्हणाल्या की पायाभूत सुविधांचे पुढील दशक अधिक बांधकाम करण्याबद्दल नाही; ते अधिक चांगले बांधकाम करण्याबद्दल आहे.

भारताच्या समृद्ध संस्कृतीला ताकद आणि प्रेरणेचा स्रोत मानून, डॉ. अदाणी यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की त्यांनी स्वतःला उभरत्या भारतासाठी योगदान देणारे नागरिक म्हणून पाहावे. हा विचार अदाणी समूहाच्या इंडॉलॉजी उपक्रमाशी आणि राष्ट्रनिर्माणाच्या त्यांच्या वचनबद्धतेशी निगडित आहे. तुम्ही अशा संस्कृतीचे वारसदार आहात ज्याने सखोल विचार केले, धाडसाने काम केले आणि नैतिकदृष्ट्या नेतृत्व केले. ही परंपरा तुमच्या करिअरमध्ये फक्त आठवणी किंवा इतिहास म्हणून नव्हे, तर एक जबाबदारी म्हणून घेऊन जा.

पदवीधरांना प्रोत्साहित करत त्यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाकडे वळण्याचे, विविध क्षेत्रांचे ज्ञान एकत्र करण्याचे आणि नैतिकतेवर आधारित नवोन्मेषाद्वारे भारताच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले. डॉ. अदाणी यांनी विद्यापीठाच्या नवीन, भविष्यासाठी तयार कॅम्पसच्या योजनांचीही आठवण करून दिली, जेथे संशोधन, सहकार्य आणि उद्योगासह शिक्षण यांना प्रोत्साहन दिले जाणार आहे.

दीक्षांत समारंभातील भाषण श्री सावी एस. सोईन, अध्यक्ष, क्वालकॉम इंडिया यांनी दिले. त्यांनी विद्यार्थ्यांचे आणि पदकधारकांचे अभिनंदन केले आणि सेमीकंडक्टर, मोबिलिटी, एआय, कनेक्टिव्हिटी आणि डिजिटल पायाभूत सुविधासह भारताच्या प्रगत तंत्रज्ञानातील वाढत्या नेतृत्वावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, जसे भारत सेमीकंडक्टर, एआय, मोबिलिटी आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये आपले नेतृत्व वेगाने वाढवत आहे, तसतसे उद्योग आणि शिक्षण संस्था यांच्यातील भागीदारी अधिक महत्त्वाची झाली आहे. अदाणी विद्यापीठाचा बहुविषयक शिकण्याची पद्धत विद्यार्थ्यांना केवळ या बदलात सहभागी होण्यास तयार करत नाही, तर नवोपक्रम, अनुकूलता आणि भारतातील प्रत्यक्ष समस्या सोडवण्याच्या दृष्टीने जागतिक दृष्टिकोन ठेवून नेतृत्व करण्यास तयार करते.

श्री सोईन यांनी विद्यार्थ्यांना सतत शिकत राहण्याची, संपूर्ण प्रणालीचा विचार करण्याची, नैतिक नेतृत्वाची आणि शाश्वततेची जाण ठेवण्याची क्षमता विकसित करण्यास प्रोत्साहित केले, जे आधुनिक आणि सक्षम भारत घडवण्यासाठी अत्यावश्यक आहे.

समारंभाचा समारोप ग्रुप फोटो घेऊन झाला, ज्याने पदवीधर विद्यार्थ्यांसाठी अभिमानाचा क्षण निर्माण केला आणि सर्व ८७ पदवीधर तसेच ३ गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला.

२०२२ मध्ये स्थापन झालेले अदाणी विद्यापीठ आता भविष्यास अनुकूल शिक्षणाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. हे विद्यापीठ तंत्रज्ञान, संशोधन आणि उद्योग सहकार्य यांचे एकत्रीकरण करून वेगाने बदलणाऱ्या जगासाठी सक्षम नेते घडवण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

# बाबासाहेबांना बसपाचे अभिवादन



**नागपूर, ७ डिसेंबर :** डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बहुजन समाज पार्टीच्या वतीने संविधान चौकात बसपाचे प्रदेश महासचिव पृथ्वीराज शेंडे, नागोराव जयकर, प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, प्रदेश सचिव प्रा सुनील कोचे व माधव भोंडे, जिल्हाध्यक्ष योगेश लांजेवार महिला नेत्या सुनंदाताई नितनवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी दक्षिण नागपूरातील त्रिशरण चौकातून बसपा नेते उत्तम शेवडे व सहदेव पिल्लेवान यांचे नेतृत्वात संविधान रॅली काढण्यात आली होती. या रॅलीचा संविधान चौकात समारोप झाला.

याप्रसंगी प्रामुख्याने पूर्व विदर्भ चे विवेक हाडके, प्रफुल मानके, जिल्हा प्रभारी राजकुमार बोरकर, जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे, माजी मनपा पक्ष नेते जितेंद्र घोडेस्वार, माजी नगरसेवक संजय जयस्वाल, गौतम पाटील, नरेंद्र वाल्हे, देवेंद्र वाघमारे, उमेश मेश्राम, अभिलेश वाहने, रामकुमार गो, वामन सोमकुवर, सदानंद जामगडे, माया ऊके, सुमंत गणवीर, राजेश नंदेश्वर, भीमराव वैद्य, अंकित थूल, परेश जामगडे, अविनाश बडगे, विजयकुमार डहाट, नरेश वासनिक, अविनाश नारनवरे, संभाजी लोखंडे, विजय वाघमारे, माधुरी शंभरकर, वर्षाताई वाघमारे, विमलताई इंगळे, माधुरी मेश्राम, सुषमा गणवीर, शामराव तिरपुडे, अविनाश गेडाम, दिलीप लांडगे, प्रकाश फुले, अनिल मेश्राम, राजेश मेंढे, संगीतबाबू इंगळे, अरविंद तायडे, जगदीश गजभिये, प्रकाश गजभिये, रणजीत सहारे, प्रेम पाटील, किशोर गोसावी, बुद्धिवान सुखदेवे, सुमीत जांभुळकर, संजय डहाट, संघर्ष वानखेडे, तुषार साखरे, आशिष उरकुडे, नितीन वंजारी, बंडू पाटील, बालचंद जगताप, ओमप्रकाश शेवाळे यांचे सहित मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# विधिमंडळात सरकारने शेतकऱ्यांच्या स्थितीवर चर्चा करावी!

## 'आयएसी' राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांची मागणी



**पुणे, ७ डिसेंबर :** राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सरकार ने संकटग्रस्त बळीराजाच्या स्थितीवर चर्चा करीत मदतीचा हात पुढे करावा, अशी मागणी इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष, ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी रविवारी केली. चहापानावर विरोधकांचा बहिष्कार योग्य नाही. विधिमंडळात चर्चेतून मार्ग निघतो; विरोधी पक्षांनी सरकार सोबत सर्व मुद्यावर चर्चा करावी, असे आवाहन देखील पाटील यांनी केले.

सोमवार पासून नागपूर येथे सुरु होणाऱ्या अधिवेशनात सरकार ने पुण्यातील महार वतन जमीन घोटाळा प्रकरण आणि राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांच्या सिडको जमीन घोटाळा प्रकरणी निवेदन सादर करण्याची मागणी देखील पाटील यांनी केली. आगामी स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सरकारच्या मित्र पक्षातील नेत्यांची प्रकरणे बाहेर काढून अडचणीत आणण्याचा विरोधकांनाचा डाव आहे. मात्र, फडणवीस विरोधकांच्या मुद्द्यावर निवेदन करीत; योग्य निर्णय घेऊन सरकारची बाजू सांभाळून घेतील, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

राज्यातील शेतकरी अडचणीत आहे. त्यांच्या स्थितीकडे सरकार ने लक्ष देत, संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला, तर सरकार वरील सर्वसामान्यांचा विश्वास आणखी बळावेल, असे पाटील म्हणाले. महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच दोन्ही सभागृहात अधिकृत विरोधी पक्ष नेता नाही, अशात सरकारने विरोधकांच्या मुद्द्यांना बगल न देता सभागृहाचे कामकाज चालवावे, असे पाटील म्हणाले.



# दीक्षाभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**नागपूर, ७ डिसेंबर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी भेट देत दीक्षाभूमी मध्यवर्ती स्मारक येथे महापरिनिर्वाणदिनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी दीक्षाभूमी येथील मध्यवर्ती स्मारक येथे काही क्षण घालवले. दीक्षाभूमी येथील विविध माहिती त्यांनी जाणून घेतली. महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी यांच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला देखील कुलगुरूंनी भेट दिली. यावेळेस त्यांच्या समवेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमीच्या प्राचार्य डॉ. दीपा पन्हेकर, विद्यापीठाचे ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रा. काँ. पा नागपूर शहरातर्फे अभिवादन

**नागपूर, ६ डिसेंबर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नागपूर शहरातर्फे संविधान चौक येथे भारतरत्न, संविधान शिल्पकार, महामानव परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष मा. राजाभाऊ टाकसाळे यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमाचे नियोजन युवक विभागातर्फे करण्यात आले होते.

युवक अध्यक्ष विशाल खांडेकर व युवक कार्याध्यक्ष अभिदत्त फाले यांनी कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी सांभाळली.

यावेळी प्रदेश महासचिव तानाजी वनवे, जानबा मस्के, राजेंद्र भोयर, भरत शर्मा, शोभा येवले, संगीता अंबारे, अंजनाबाई मेश्राम, रामटेके ताई, नंदाबाई चव्हाण, सागर मेश्राम, चंद्रमणी मेश्राम, सुकेश नारनवरे, विजय बावणे, सचिन रंगारी, आकाश चिमणकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नितीन बाबू म्हणतो, मालिकेत लीप आल्यानंतर आधीपासून स्थापित असलेली व्यक्तिरेखा साकारण्यासाठी तयारी, निरीक्षण आणि मार्गदर्शन या सगळ्याचीच गरज असते

**मुंबई, ७ डिसेंबर :** सोनी सबवरील प्रेक्षकांची आवडती पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका एका नवीन वेधक टप्प्यावर आली आहे. कथानकाने नुकतीच ७ वर्षांची झेप घेतली आहे. या लीपनंतर चिरागची भूमिका अधिक जटिल झाली आहे आणि या भूमिकेत दाखल झालेल्या नितीन बाबूचे प्रेक्षकांनी मनापासून स्वागत केले आहे. आधीचा मोहक आणि सौम्य चिराग आता खूप बदलला आहे. राजकारण, नातेसंबंध आणि वैयक्तिक बदलांच्या गुंतागुंतीच्या जगात त्याने प्रवेश केला आहे.

नितीन बाबूशी संवाद साधला असता त्याने आधीपासून स्थापित व्यक्तिरेखा करण्याचा अनुभव आणि लीपनंतर चिरागच्या व्यक्तिरेखेच्या जडणघडणीविषयी सांगितले.

१. तुला जेव्हा चिरागची भूमिका देऊ करण्यात आली, तेव्हा तुझी प्रतिक्रिया काय होती?

मला जेव्हा चिरागच्या भूमिकेचा प्रस्ताव मिळाला, तेव्हा मला कुतूहल आणि उत्साह या दोन्ही भावना जाणवल्या. उत्साह यासाठी की ही व्यक्तिरेखा जिवंत वाटली, त्यामध्ये क्षमता दिसल्या आणि कुतूहल यासाठी की, मला हे लक्षात आले की, त्याच्यामध्ये नव्याने शोध घेण्यासारखे बरेच काही आहे. मी हा विचार केला होता की, हे एक मजेदार आव्हान असणार आहे. ही व्यक्तिरेखा जिवंत करण्याची संधी मला मिळाली याबद्दल मी कृतज्ञ आहे.

२. चिरागच्या व्यक्तिमतवामधील कोणते पैलू तुला विशेष आकर्षक किंवा साकारण्यासाठी आव्हानात्मक वाटले?

चिराग एक समर्पित पक्ष सदस्य आहे, जो आपल्या भूमिकेतून अधिकार आणि जबाबदारी दोन्ही सांभाळतो. तो प्रेमळ आणि इतरांना मदत करणारा असला तरी कधीकधी त्याचे बोलणे इतरांना उद्धट किंवा फटकळ वाटते. पण त्या कोरडेपणाखाली एक दयाळू मनाचा, प्रामाणिक, प्रेमिकाचे व्यक्तिमत्त्व लपलेले आहे. आपल्या आसपासच्या सगळ्यांची काळजी तो घेतो आणि खऱ्याच्या बाजूने ठामपणे उभा राहतो. जे पटत नाही त्याला तो अजिबात समर्थन देत नाही.

३. आधीपासून अस्तित्वात असलेली व्यक्तिरेखा एका लीपनंतर साकारण्यासाठी तू काय तयारी केलीस? काही विशेष कार्यशाळा किंवा व्यक्तिरेखेचा अभ्यास, त्याबाबत मार्गदर्शन वगैरे?

आधीपासून स्थापित व्यक्तिरेखा एका लीपनंतर साकारण्यासाठी तयारी, निरीक्षण आणि खूप मार्गदर्शन या तिन्हीची गरज आहे. चिराग मुळात कसा आहे, त्याची नाती, त्याचा प्रवास आणि प्रेक्षकांच्या अपेक्षा समजून घेण्यासाठी मी आधीचे एपिसोड बघू लागलो. त्याची



देहबोली आणि बोलण्यातला टोन यावर मी विशेष काम केले. चिराग प्रेमळ आणि दयाळू स्वभावाचा आहे. पण वाढती ताकद आणि तीव्रता यामुळे कधीकधी तो फटकळ वाटतो. आमच्या दिग्दर्शकाचे श्रेय मोठे आहे. त्यांचे मार्गदर्शन, स्पष्टता आणि निष्ठा यामुळे माझ्यासाठी हा बदल साकारणे खूप सोपे झाले. त्यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला त्यामुळे मला नव्या टप्प्यावर चिरागची व्यक्तिरेखा उभी करण्याचा आत्मविश्वास मिळाला.

४. चिरागच्या प्रवासातील असा कोणता भाग आहे का, जो तुझ्याशी मिळताजुळता आहे?

होय तर. चिरागची सशक्त नैतिकता मला आपलीशी वाटते. वरवर पाहता तो फटकळ किंवा तिरसट वाटला तरी मुळात तो प्रामाणिक, प्रेमळ आहे आणि जे योग्य आहे, त्याची बाजू घेणारा आहे. ही आंतरिक ताकद आणि प्रामाणिकपणा हे असे गुण आहेत, जे माझ्यात आहेत असे मला वाटते. जबाबदारी आणि भावना यांचे संतुलन साधण्याचा त्याचा प्रवास मला खूप खरा वाटतो. चिरागप्रमाणेच मला देखील खऱ्याच्या बाजूने उभे राहायला आवडते, मग तसे करणे सोपे नसले तरी.

५. पुष्पाचे तिच्या मुलांशी असलेले नाते हा या मालिकेचा आत्मा आहे. या लीपनंतर पुष्पा आणि चिराग यांच्यातील नात्याचे वर्णन तू कोणत्या शब्दात करशील?

त्यांच्यातील ते भावनिक नाते अजूनही तितकेच दृढ आहे, पण आता त्याला आदर आणि समजूतदारपणा यांचा एक स्तर मिळाला आहे. चिराग मोठा झाला आहे, जबाबदारी घेतो आहे आणि पुष्पाला हे समजते आहे. त्यांच्या वाद-विवाद होऊ देत, कधीकधी तो कोरडा देखील वाटू देत पण आतून मात्र तो अजूनही तिचा प्रेमळ, तिची काळजी घेणारा मुलगा आहे. या नात्यातील आई आणि मुलगा या दोन्ही समर्थ व्यक्ती आहेत पण एकत्र झाले की त्यांची ताकद आणखीनच वाढते.

६. करुणा पांडे आणि इतर कलाकारांसोबत काम करण्याचा अनुभव कसा आहे?

हा अनुभव खरोखर फार सुंदर आहे. करुणा मॅम फारच साध्या आणि प्रेमळ आहेत. प्रत्येक दृश्यात त्या एक प्रामाणिकपणा घेऊन येतात. त्यामुळे तुमचा परफॉर्मन्सदेखील सुधारतो. तिच्या सोबत काम करताना सहजता जाणवते. तुम्हाला त्यांची साथ नेहमीच असते. तसे सर्वच कलाकार आपुलकी दाखवतात आणि एकमेकांना मदत करतात. या सेटवर एक सकारात्मक ऊर्जा आहे. सर्व जण एक कुटुंब असल्याची भावना आहे. त्यामुळे रोज इथे येण्यासाठी मी उत्सुक असतो.

७. आगामी भागांमध्ये प्रेक्षकांना काय बघायला मिळणार आहे?

प्रेक्षकांना भरपूर भावनिक चढ-उतार, नवे संघर्ष आणि नात्यांमधील धक्कादायक वळणे बघायला मिळणार आहेत. चिरागसमोर काही आव्हाने येतील, ज्यामध्ये त्याची ताकद आणि भावना दोन्हीची कसोटी होईल. एकंदरित, लीपनंतर देखील मालिकेचा आत्मा तोच आहे- कौटुंबिक नाती, दृढ मूल्ये आणि हृदयस्पर्शी क्षण- पण अडचणी मात्र आता जरा जास्तच.


# आज का अंदाज

## सोमवार ८ डिसेंबर २०२५

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| २ - ३ - ६ - ९ | २ - ५ - ६ - ७ |
| १४७ - ३०० - ६०० - २३४ | १३८ - २३० - १७८ - ११५ |
| ३९० - ४९० - ७९० - ३७९ | ३४५ - ३५७ - ३५८ - ४४९ |
| २०० - ५८० - ५५६ - ४७८ | २५५ - ४५६ - २६८ - ३७७ |
| जोडी | जोडी |
| २१ - ३० - ६५ - ९५ | २९ - ५९ - ६१ - ७१ |
| २४ - ३१ - ६८ - ९८ | २० - ५० - ६३ - ७३ |
| २० - ३७ - ६४ - ९४ | २८ - ५८ - ६४ - ७४ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ८ डिसेंबर

## सोमवार ८ डिसेंबर २०२५

सर्व बाजार साठी

१० - ४० - ७५ - ८५
१२ - ४२ - ७९ - ८९
१६ - ४६ - ७३ - ८३

१०० - १५८ - ८९० - २३३
२९० - ३४७ - २५० - ३७८
३८० - २२० - १६० - ४६८

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. ओपन डे | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७० | ४४६ | १६९ | ३५० | ४८० | १५९ |
| ४६० **०** | २६६ **४** | २६८ **६** | ४४० **८** | ३९० **२** | ६९० **५** |
| ५५० | ७८९ | ३६७ | ५५८ | २०० | ७८० |

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| ४७० | ३४६ | १४० | ७०० | २३४ | १५५ |
| ३८० **१** | ४९० **३** | ४४७ **५** | १६० **७** | ३७९ **९** | २२७ **१** |
| २९० | ५८० | ७९९ | ३४० | ४७८ | ३३५ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
० - ८ - ४ - १ - ७

जबरदस्त पास होणारे चान्सेस
प्रो. बालाजी कुमार 9822486034


# राशीभविष्य

**मेष :** भागीदारी व्यवसायात केवळ कठोर परिश्रमावर अवलंबून राहिल्यास नफा मिळेल. नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. गैरसमज मोकळ्या संभाषणातून दूर होऊ शकतो.

**वृषभ :** आज प्रत्येक काम प्रामाणिकपणे आणि एकाग्रतेने पूर्ण करतील. त्याचे परिणाम चांगले मिळतील. मानसिक ऊर्जा वाढेल. जमीन किंवा मालमत्तेत गुंतवणुकीवर चर्चा पुढे सरकू शकते.

**मिथुन :** तुमचा सामाजिक आदर आणि मानसन्मान वाढेल. धार्मिक स्थळाला भेट देण्याची शक्यता आहे. नुकसान होण्याची शक्यता आहे. व्यवसाय फायदेशीर राहील, परंतु तितकेच प्रयत्न आवश्यक आहेत.

**कर्क :** आजचा दिवस अत्यंत सकारात्मक राहील. व्यवसायात तुम्ही केलेल्या कोणत्याही पूर्वीच्या गुंतवणुकीमुळे तुम्हाला दुप्पट नफा मिळू शकेल. प्रेमसंबंधांमध्ये जवळीक वाढेल.

**सिंह :** आजचा दिवस सामान्य असेल पण कामामुळे खूप व्यस्त राहील. नवीन प्रकल्प सुरू झाल्याने उत्साह वाढेल. मुले खेळकर मूडमध्ये असतील. आज कोणतेही आर्थिक व्यवहार टाळा.

**कन्या :** आजचा दिवस सरासरी असला तरी, राजकारण, सामाजिक कार्य किंवा प्रशासकीय क्षेत्रात काम करणाजयांना आज लक्षणीय यश मिळू शकते. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात रस वाढलेला दिसेल.

**तूळ :** घरात किरकोळ वाद उद्भवू शकतात, पण तुम्ही ते हाताळू शकाल. कुटुंबात काही कारणास्तव चिंता निर्माण होऊ शकते. व्यवसायात चांगला नफा होईल. नवीन उपक्रमात गुंतवणूक करण्याचा विचार कराल.

**वृश्चिक :** दिवस घरकामात आणि आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यात जाईल, ज्यामुळे तुमचा बराचसा वेळ जाईल. विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासात अधिक मेहनत घेणे गरजेचे आहे.


**धनु :** दैनंदिन गरजांसाठी खर्च वाढेल आणि प्रलंबित निधी मिळण्याची चिन्हे आहेत. आजचा दिवस कौटुंबिक वातावरणात जाईल. कुटुंबाच्या मदतीने वैवाहिक जीवनातील तणाव संपू शकतो.

**मकर :** तुमच्या इच्छा पूर्ण होतील. मित्राच्या मदतीने प्रलंबित कामे पूर्ण होतील. व्यापारी आणि दुकानदारांना अपेक्षित नफा मिळेल, ज्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.

**कुंभ :** जोडीदाराकडून सहकार्य मिळेल. एखाद्या अनुभवी व्यक्तीकडून मिळालेला सल्ला भविष्यात उपयुक्त ठरू शकतो. मित्रांसोबत वैयक्तिक आणि अत्यंत खासगी गोष्टी शेअर करणे टाळा.

**मीन :** आजचे वातावरण आनंददायी असेल. तुमचे जीवन सकारात्मक वळण घेऊ शकते. कौटुंबिक लग्नाबाबत चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. गरज पडल्यास पैसे उधार घेणे सोपे होईल.

# शब्दकोडे क्रमांक २२९१



**आडवे शब्द :-**

२) जागा, स्थान, देवस्थान
३) पारवा
६) अंग मोडून येणे
९) अंदाज, तर्क
१०) जादू
१२) सिद्ध
१४) पगार
१६) आकार, वजन
१७) देखत, समोर
१८) फरक
१९) जन्म-मृत्यू
२१) जनावरांचे बछडे
२२) संथ, सावकाश
२४) सोपे
२६) तुकडी, पाकळी
२९) उष्ण
३१) राजा हरिश्चंद्राची पत्नी
३३) एक क्षार
३४) मुलगा (हिंदी)
३५) काढलेली सुट्टी
३६) शहर
३८) शपथ
३९) सारख्या अंतरावर
४३) अंजनाचा एक प्रकार
४४) मला
४५) छोटा डबा
४६) मनाची घालमेल
४८) चणचण, उणीव
५०) चांदी
५२) पाठवलेला
५३) मोठे उथळ ताट
५४) डुक्कर
५५) कलावंत
५७) पुन्हा
५८) उत्साह, नवा जोम

**उभे शब्द**

१) मंगलाष्टकातील शुभ चरण
२) क्रिकेटमधील फिल्डींग
३) कृतीप्रमाणे त्याचा परिणाम भोगावा लागतो या अर्थाची म्हण
४) तृष्णा
५) निमग्न, रममाण
६) विद्या
७) जिवलग मैत्रीण
८) इंधन
११) हालचाल
१३) मृत्यूदेवता
१५) होडी
१६) संगीतातील एक राग
१९) ढग
२०) गरज
२३) डोंगराचा तुटलेला भाग
२५) वेल, वल्लरी
२७) वस्ती
२८) मऊ
३०) घर (हिंदी)
३२) चापबाण
३७) गाजावाजा
३८) ओझी वाहणारा
३९) सारखा
४०) मार्जार
४१) कसेबसे
४२) उपकार
४६) हुंगण्याचे तंबाखू चुर्ण
४७) एक सुगंधी वनस्पती
४९) सुका, कृश
५१) सततचे नामस्मरण
५५) वाकलेला, नम्र
५६) शरम

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर




# फिनले मिल, जिल्हा निर्मिती, पांदण रस्ते, संत्रा प्रकल्प अपूर्ण

## अचलपूरच्या प्रश्नांना अधिवेशनात हवा मिळणार का ?

**बादल डकरे**

**चांदूरबाजार, (दि. 7)** – राज्यातील महायुती सरकारला वर्षपूर्ती झाली असली तरी अचलपूर मतदारसंघातील अनेक प्रमुख प्रश्न अद्यापही मार्गी लागलेले नाहीत. निवडणुकीपूर्वी जिल्हा निर्मितीपासून फिनले मिलच्या प्रश्नापर्यंत अनेक आश्वासने देण्यात आली होती. मात्र, वर्ष उलटूनही परिस्थिती जसंच्या तशी आहे. त्यामुळे हिवाळी अधिवेशनात हे मुद्दे गाजणार का, असा प्रश्न मतदारसंघात पुन्हा चर्चेला आला आहे.



**जिल्हा निर्मिती व फिनले मिलचा प्रश्न अधांतरी**

अचलपूरला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याचे आश्वासन अनेक नेत्यांनी सभांमध्ये दिले होते. परंतु ठोस घोषणा अद्याप झालेली नाही. फिनले मिलचा जुना प्रश्नही तसाच प्रलंबित आहे. लोकप्रतिनिधी बदलले; पण प्रश्न मात्र कायम असल्याची खंत नागरिक व्यक्त करतात.

**पांदण रस्त्यांची दुरवस्था; चौकशीची शक्यता**

तालुक्यातील अनेक पांदण रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत. एका रस्त्यावर तीन योजनांतून निधी खर्च होऊनही काम पूर्ण न झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळते. याप्रकरणी अधिकारी, कर्मचारी व ठेकेदारांवर कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे. इतर विकासकामेही निधीअभावी अडकली असून अनेक घरकुल लाभार्थ्यांचे अंतिम हप्ते थकले आहेत. नव्या लाभार्थ्यांना दुसरा टप्पा मिळालेला नाही.

### राष्ट्रीय महामार्गाचे काम ठप्प; टोल सुरू करण्याची घाई

चांदूरबाजार-परतवाडा राष्ट्रीय महामार्गावरील दोन पुलांचे काम अद्याप सुरू झालेले नाही. काम रखडलेले असताना टोल सुरू करण्याची घाई केल्याबद्दल नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत. या मुद्द्यावर आमदारांनी शासनाला सवाल करावा, अशी अपेक्षा आहे.

### संत्रा प्रकल्पाचा प्रश्न गंभीर; शेतकरी चिंतित

अचलपूर मतदारसंघातील संत्रा बागा नष्ट होत आहेत. उत्पादन खर्च वाढत असूनही योग्य मोबदला न मिळाल्याने शेतकरी नाराज आहेत. संत्रा प्रकल्प मंजूर होणार का, की संत्रा बागायतीची परंपरा काही वर्षांतच संपणार, अशी चिंता शेतकऱ्यांमध्ये वाढत आहे. आगामी हिवाळी अधिवेशनात आमदार प्रवीण तायडे हे सर्व प्रश्न कितपत प्रभावीपणे मांडतात, याकडे मतदारसंघाचे लक्ष लागले आहे. वाढत्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर अचलपूरच्या अपेक्षांना न्याय मिळणार का, हे अधिवेशनातच स्पष्ट होणार आहे.

### बोर्डी नाला व राजुरा प्रकल्प रखडलेलेच

मतदारसंघातील बोर्डी नाला प्रकल्प अद्याप अपूर्ण आहे, तर राजुरा प्रकल्पाचे काम पूर्णपणे ठप्प आहे. खरपीङ्कमोझरी मार्गावरील वाढते अपघात, मध्यप्रदेशच्या नावावरून होणारी गौण खनिज वाहतूक, अवैध वाळू, गुटखा व गोवंश तस्करी, तसेच अनेक गावांतील वाढणारी गावठी दारू व जुगाराची समस्या यथावत आहेत.

# धोक्याच्या भेगा आणि बेपर्वा प्रशासन


## बेनोडा-जरूड मार्गावरील रस्त्यांवरून उघड झालं कामाच्या दर्जाचं सत्य

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि.7)** – वरुड-अमरावती राष्ट्रीय महामार्ग जिल्ह्याची महत्त्वाची जीवनवाहिनी असून हजारो नागरिक, विद्यार्थी व शेतकरी दररोज या मार्गावरून प्रवास करतात. मात्र बेनोडा ते जरूड दरम्यानच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यावर अलीकडेच पडलेल्या खोल भेगांनी या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. दुचाकीस्वारांच्या चाकांमध्ये अडकतील इतक्या खोल भेगा असल्याने अपघाताचा धोका वाढला असून प्रशासनाच्या बेपर्वाईचे चित्र स्पष्ट होते.

टेंडर प्रक्रियेतील त्रुटी, कामाचा वेग, उद्घाटनाची घाई या सर्वांचा फटका थेट रस्त्याच्या टिकाऊपणावर झाल्याचे नागरिकांचे मत आहे. बेनोडा शहीद येथील विलास पाटील, प्रणित कुबडे, नितीन पेलागडे, धर्मेंद्र गोहाड, ज्ञानेश्वर चौधरी आणि यशवंत खडसे यांच्यासह ग्रामस्थांनी हा मुद्दा उचलून धरत तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.

काम काही महिन्यांतच खराब होणे म्हणजे तांत्रिक त्रुटी, निकृष्ट



साहित्य किंवा देखभालीचा अभाव हेच कारण असल्याचे सूचित करते. काम पूर्ण झाल्यानंतरची आवश्यक तपासणी कोठे गायब झाली हा मोठा प्रश्न आहे. राष्ट्रीय महामार्गांची मजबुती ही नागरिकांच्या सुरक्षेशी थेट संबंधित असल्याने अशा भेगा भविष्यात गंभीर अपघातांना आमंत्रण देऊ शकतात.

राष्ट्रीय महामार्ग विभागाने तत्काळ पाहणी करून दुरुस्तीची प्रक्रिया सुरू करावी, अशी नागरिकांची मागणी असून रस्ते सुरक्षित असले तरच विकासाची गती सुरळीत राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# आयआयटी बॉम्बेतून अभिषेक चनेकार यांना पीएचडी

## आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधनाची दखल

महासागर | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, (दि. 7)** – तालुक्याचे सुपुत्र अभिषेक अरविंद चनेकार यांनी आयआयटी बॉम्बे येथून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये पीएचडी पदवी संपादन करून परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. बेंबळा प्रकल्पातील सेवानिवृत्त उपअभियंता अरविंद चनेकार यांचे चिरंजीव असलेल्या अभिषेक यांनी Active Thermal Control of Power Semiconductor Devices या अत्याधुनिक विषयावर संशोधन पूर्ण केले. पॉवर सेमिकंडक्टर उपकरणांमधील तापमान नियंत्रण सुधारून त्यांची कार्यक्षमता, सुरक्षितता आणि आयुष्य वाढवणे




हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य उद्देश असून याचा उपयोग उद्योग, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक वाहने तसेच नवीकरणीय ऊर्जा प्रणालींमध्ये मोठ्या प्रमाणावर होणार आहे.

प्रा. संदीप आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक यांनी 18 नोव्हेंबर 2025 रोजी संशोधन प्रबंध यशस्वीरीत्या सादर केला. त्यांच्या कार्याची आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये दखल घेतली गेली असून बेल्जियम, डेन्मार्क आणि अमेरिका येथे त्यांनी आपले संशोधन सादर केले आहे. त्यामुळे त्यांचे काम जागतिक स्तरावर पोहोचले आहे. अभिषेक यांच्या यशात आई सुनिता, वडील अरविंद, बहीण राधिका, जावई तसेच मित्रपरिवाराचे मोठे योगदान आहे. मार्गदर्शक आणि कुटुंबियांच्या सहकार्यामुळे हे यश शक्य झाले, असे मनोगत अभिषेक यांनी व्यक्त केले. त्यांच्या यशामुळे चनेकार कुटुंब व परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

# गजानन महाराज विजय ग्रंथाची परीक्षा

**अमरावती, (दि. 7)** श्री रामदेव बाबा भक्त परिवार, श्री गजानन महाराज अध्ययन समूह शिवनगर आणि वनमाला देशमुख यांच्या संयुक्त विद्यमाने गजानन महाराज विजय ग्रंथाची परीक्षा आयोजित करण्यात आली. लहरी बाबा मंदिर, लक्ष्मीनगर येथे पार पडलेल्या या परीक्षेला सुमारे 90 भाविकांनी सहभाग नोंदवला. 100 गुणांच्या या परीक्षेला सकाळी 11 वाजता सुरुवात होऊन दुपारी 12.30 वाजता परीक्षा संपली. परीक्षेनंतर सर्व भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल माजी शिक्षिका



वनमाला देशमुख यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. परीक्षेचा निकाल लवकर जाहीर होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# सेमाडोह येथे ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ उपक्रमांतर्गत वनराई बंधारा बांधणी

## रब्बी हंगामातील शेतीला मोठा दिलासा

महासागर | प्रतिनिधी

**चिखलदरा, (दि. 7)** – चिखलदरा कृषी विभागाच्या वतीने तालुक्यातील सेमाडोह येथे गावकऱ्यांच्या श्रमदानातून ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ या उपक्रमांतर्गत वनराई बंधारा बांधण्यात आला. पावसाळा संपल्यानंतर पाण्याची कमतरता भासू लागल्याने यंदा हा



बंधारा गावकऱ्यांसाठी मोठा आधार ठरत आहे. सहाय्यक कृषी अधिकारी शितल भास्कर यांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांनी कमी खर्चात व पारंपारिक पद्धतीने हा बंधारा उभारला. नाल्यातील पाण्याचा प्रवाह अडवण्यासाठी गोण्या भरून त्यात वाळू व माती टाकण्यात आली. या गोण्यांचा वापर करून बंधारा मजबूत करण्यात आला. परिणामी मोठ्या प्रमाणात पाणी साठवून ठेवणे शक्य झाले आहे. या वनराई बंधाऱ्यामुळे येत्या रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरभरा, भाजीपाला अशा पिकांना पाणीपुरवठा करता येणार आहे. तसेच गावातील पाळीव प्राणी आणि वन्य प्राण्यांसाठीही काही दिवस पिण्याच्या पाण्याची उपलब्धता राहणार आहे. नदी-नाल्यावरील पाण्याचा पारंपारिक पद्धतीने अडवलेला हा साठा शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या गरजा मोठ्या प्रमाणात पूर्ण करणार आहे. वनराई बंधारा बांधकामाच्या वेळी सेमाडोह येथील सामाजिक कार्यकर्ते, ग्रामपंचायत सदस्य तसेच इतर शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी कृषी विभागाचे आभार मानले, सांगितले की, कृषी विभागाकडून योजनांची माहिती व मार्गदर्शनामुळे ग्रामीण भागात पाणी संवर्धनाची कामे अधिक परिणामकारक होत आहेत.

# विश्वासू नेतृत्वामुळे अनिल लोखंडे यांच्यावर युवा सेनेची भिस्त

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि. 7)**– वरुड तालुक्यातील टेंभुर्खेडा येथील रहिवासी अनिल लोखंडे हे युवा सेना (शिंदे गट) तालुकाप्रमुख म्हणून कार्यरत असून त्यांच्या नेतृत्वामुळे संघटनेला नवचैतन्य मिळाले आहे. लोखंडे यांच्या सातत्यपूर्ण जनसंपर्क, कार्यकर्त्यांवरील व्यक्तिगत लक्ष आणि समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याच्या शैलीमुळे युवा सेनेचे कामकाज अधिक परिणामकारक झाले आहे.

युवा प्रश्न, रोजगार मार्गदर्शन, सामाजिक उपक्रम आणि गावागावांत संघटन बळकटीकरण यावर त्यांनी दिलेला भर विशेष ठरत आहे. कार्यकर्त्यांशी थेट संवाद आणि प्रामाणिक कार्यपद्धतीमुळे संघटनेत पारदर्शकता वाढली



आहे.

स्थानिक पायाभूत समस्या, तरुणांसाठी उपक्रम आणि विकासकामांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग यामुळे कार्यकर्त्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. तालुका पातळीवर शिंदे गटाची धोरणे पोहोचवून युवाशक्तीला दिशा देण्याचे त्यांचे प्रयत्न आगामी काळात युवा सेनेची ताकद वाढवणारे ठरणार आहेत.

# मंत्रालयीन सचिव डॉ. बी. जी. पवार यांची दौऱ्यात समस्यांची केली प्रत्यक्ष पाहणी

## मेळघाटातील खडीमल, माखला ग्रामवासीयांच्या मूलभूत सुविधांचा गंभीर प्रश्न

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, (दि.7)** – मेळघाटातील अतिदुर्गम खडीमल आणि माखला या गावांमध्ये वीज, रस्ता आणि पाणीपुरवठ्यासारख्या मूलभूत सुविधांचा गंभीर तुटवडा असल्याची पुन्हा एकदा जाणीव करून देत, महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा विभागाचे सह प्रधान सचिव डॉ. बी. जी. पवार यांनी 5 डिसेंबर रोजी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या दौऱ्यात सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तसेच एकात्मिक बाल विकास विभागाचे अधिकारी सहभागी होते.

खडीमल आणि माखला येथे ग्रामस्थांशी थेट संवाद साधताना पाणीपुरवठा व्यवस्थेतील गंभीर



त्रुटींचा मुद्दा पुढे आला. विहिरीतील पाणी उचलून टाकीत पोहोचवण्यासाठी वीज पुरवठ्याची आवश्यकता असते; मात्र या गावांमध्ये अद्याप महावितरणची वीज पोहोचलेली नाही. पर्याय म्हणून बसविण्यात आलेली सोलर प्रणाली पावसाळ्यात नीट कार्यरत राहत नसल्याने भर पावसातही ग्रामस्थांना डोक्यावर हंडे वाहून पाणी आणावे लागते, अशी व्यथा नागरिकांनी व्यक्त केली. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर व बफर क्षेत्रांच्या सीमांबाबत स्पष्टता नसल्याने प्रत्येक विकासकामात अडथळे निर्माण होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी मांडली. खडीमल व माखला ही दोन्ही गावे अशाच समस्यांना सामोरे जात आहेत. माखला गावाचे नाव मूळ भेट यादीत नसतानाही ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ता धनंजय सायरे यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनानंतर डॉ. पवार यांनी तातडीने गावात भेट दिली. सरपंच शंकर दारसिंबे, पोलिस पाटील शिवकली सेलूकर आणि ग्रामसेवक मावस्कर यांनी गावातील अडचणींची सविस्तर माहिती दिली. उपसरपंच देवकी मावस्कर यांनी ग्रामस्थांची व्यथा मांडताना सांगितले, पावसाळ्यात सोलर मोटार चालत नसल्याने आम्हाला पाणी हंड्यात आणण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागतो. वीजपुरवठा उपलब्ध करून देऊन विहिरीचे पाणी टाकीत आणण्याची व्यवस्था करावी. तसेच टेम्भूरुढाणा वस्तीसाठी स्वतंत्र टाकीची उभारणी करावी. मेळघाटातील मूलभूत सुविधांचे प्रश्न अजून किती काळ प्रलंबित राहणार, असा प्रश्न या दौऱ्यानंतर पुन्हा समोर आला आहे.

# कॅंडल मार्च काढून वाहिली बाबासाहेबांना आदरांजली



महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर, (दि. 7)** – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 69व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य कॅन्डल मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले. संविधान चौक येथून सुरू झालेली रॅली जयस्तंभ चौक, शिवाजी चौकासह शहरातील विविध मार्गांमधून जात शेकडो अनुयायांनी मेणबत्त्यांच्या प्रकाशातून महामानवाला भावपूर्ण अभिवादन केले.

रॅलीत सहभागी अनुयायांनी बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा संदेश दिला, की जसे मेणबत्ती स्वत: जळून इतरांना प्रकाश देते, तसंच बाबासाहेबांनी आपला सुखाचा मार्ग सोडून शोषित, पीडित, वंचित आणि महिलांना उज्ज्वल भविष्य दिलं.

सदर कार्यक्रम शांततामय आणि सुव्यवस्थित पार पडावा यासाठी शहरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी मार्गदर्शन, वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षा सुनिश्चित करण्याची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली, ज्यामुळे रॅली सुरळीतपणे संपन्न झाली.

# नांदगाव खंडेश्वर तालुका कृषी कार्यालयाला मिळाले भंगार वाहन

## नवीन वाहन अद्यापही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेच

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर (दि. 7)** – भातकुली तालुका कृषी कार्यालयातील बंद अवस्थेत असलेले एमएच 27-एए-174 क्रमांकाचे शासकीय वाहन नुकतेच नांदगाव खंडेश्वर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाला देण्यात आले. सुमारे पंधरा वर्षे जुने हे वाहन अतिशय जीर्ण अवस्थेत असून वारंवार बंद पडणे, तांत्रिक बिघाड अशा कारणांमुळे कार्यालयीन कामकाजात मोठे अडथळे निर्माण होत आहेत. नांदगाव कार्यालयाकडे पूर्वीपासून वाहनाची कमतरता असल्याने हे भंगार वाहन मिळाल्याने अधिकच गैरसोयी वाढल्या आहेत.

या वाहनासोबत पाठविण्यात आलेला चालकही भातकुली येथील असून नांदगावमधील



चालक पद रिक्त आहे. दरम्यान, वाहन अत्यंत निकृष्ट असल्याने काही दिवसांपूर्वीच त्या चालकाची बदली अमरावती येथील वरिष्ठ कार्यालयात झाल्याची माहिती मिळते. परिणामी कार्यालयाकडे वाहन असूनही चालक नसल्याची विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. भातकुली येथील भंगार वाहन नांदगावकडे पाठविण्यामागे नेमका हेतू काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण नांदगाव खंडेश्वर कार्यालयास मंजूर असलेले नवीन वाहन सध्या अमरावती येथील उपविभागीय कृषी अधिकारी वापरत असल्याची बातमी काही दिवसांपूर्वी चर्चेत आली होती. या प्रकरणावर वरिष्ठांनी जाब मागितल्यानंतर प्रकरण झाकण्यासाठी न चालणारे वाहन नांदगावकडे पाठविल्याचा आरोप होत आहे.

नियमांनुसार पंधरा वर्षे जुने वाहन डिस्मेंटल करण्यात यावे, असे असूनही ते नांदगावला पाठविल्याने तालुकावासीयांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. हे वाहन सध्या कार्यालयासमोर उभे असून ‘शोभेची वस्तू’ बनले आहे. त्यामुळे या प्रकरणात थातुरमातुर उपाय करून तालुकावासीयांची दिशाभूल केल्याचे आरोप होत आहेत. या प्रकारामुळे नांदगाव खंडेश्वर तालुक्याला ‘सावत्रपणाची’ वागणूक मिळत असल्याचा आरोप स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी केला असून हा अन्याय सहन केला जाणार नाही, असा इशाराही दिला आहे.

### प्रकरण हिवाळी अधिवेशनात जाणार ?

सदर बाब गंभीर असून ती कृषी मंत्र्यांच्या निदर्शनास आणली जाणार आहे. तसेच आगामी हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करण्याची तयारी सामाजिक कार्यकर्त्यांनी दर्शविली आहे.

> अमरावती जिल्ह्यातील ज्याठिकाणी शासकीय वाहन उपलब्ध नाही, अशा सर्व कार्यालयांची माहिती मागविण्यात आली आहे. नवीन वाहनांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला असून त्यासाठी सतत पाठपुरावा सुरू आहे.
>
> **राहुल सातपुते,**
> **जिल्हा कृषी अधिकारी, अमरावती.**

# पाळा ते भिवकुंडी रस्त्यावरील खड्डे उठले नागरिकांच्या जीवावर

महासागर | प्रतिनिधी

**हिवरखेड, (दि.7)** – पाळा ते भिवकुंडी या सुमारे पाच किलोमीटर रस्त्यावर नागरिकांना दुचाकी आणि चारचाकी वाहने चालविणे अवघड झाले आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे लोकांना नेहमीच धोक्याची परिस्थिती भोगावी लागते. या मार्गावर मोर्शी, पाळा आणि भिवकुंडी येथील शेतकऱ्यांनी रात्री-उशिरापर्यंत शेतीसंबंधी कामकाज करावे लागते, तसेच सोमोरच्या आई अंबामातेच्या देवस्थानाला भाविक मोठ्या संख्येने भेट देतात.

जरी महाराष्ट्रात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पार्टी, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सरकारला एक वर्ष पूर्ण झाले असले, तरी मोर्शी मतदार



संघातील या रस्त्याचे काम अद्याप सुरू झालेले नाही.

हजारो कोटींचा विकास निधी उपलब्ध असतानाही, पाळा ते भिवकुंडी मार्गावरील खड्ड्यांमुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे. नुकतेच या मार्गावरुन प्रवास करणारे शेतकरी गजानन खाडे यांची दुचाकी खड्ड्यातून घसरुन त्यांचा पाय फॅक्चर झाला. परिसरातील नागरिकांनी अनेकदा तक्रारी नोंदवल्या असून, लोकप्रतिनिधींनी रस्त्याच्या दुरुस्तीला प्राधान्य देऊन लवकरात लवकर काम पूर्ण करावे, अशी विनंती केली आहे. त्यांनी रस्त्यामुळे होणाऱ्या असुविधा आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी प्रशासनाचे लक्ष वेधण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले आहे.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

## स्वधर्म रक्षणाच्या बलिदानाचा गौरवशाली इतिहास सर्व घटकांपर्यंत पोहोचवू : मुख्यमंत्री फडणवीस

# हिंद की चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांची ३५० वी शहिदी शताब्दी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

भारतीय संस्कृतीवर, धर्मावर, विचारांवर आणि भाषेवर मुघलांनी अत्याचारांची परिसीमा गाठली. भारतीय संस्कृतीच संपविण्याचा मुघलांचा अट्टाहास होता. अशा कठीण प्रसंगी हिंद की चादर गुरु तेगबहादूर सिंग साहीबजी हे ढाल बनून पुढे आले. काश्मिरी पंडितांच्या संस्कृतीसह हिंदू धमार्चा पोत त्यांनी आपल्या बलिदानातून कायम राखला. स्वधर्माचे रक्षण व सहिष्णुता याचे प्रतीक असलेल्या श्री. गुरु तेग बहादूर सिंग साहीब यांच्या बलिदानाचा हा गौरवशाली इतिहास शालेय विद्यार्थ्यांसह प्रत्येकापर्यंत पोहोचवू, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



हिंद की चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दी समारोहानिमित्त नागपुरात नारा येथील सुरेशचंद्र सुरी पटांगणावर आयोजित भव्य समारोहात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, अल्पसंख्यांक विकास मंत्री माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, श्री संत ज्ञानी हरनामसिंघ जी, पोहरादेवी येथील धर्मगुरु डॉ. बाबूसिंग महाराज, संत बाबा बलविंदरसिंग जी, बाबा सुखिंदरसिंग जी मान, रामसिंग जी महाराज, सुनील जी महाराज, क्षेत्रीय समितीचे अध्यक्ष गुरमितसिंग खोकर, विजय सतबीरसिंग, अखिल भारतीय धर्मजागरण प्रमुख शरदराव जी ढोले, महेंद्र रायचुरा, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, या समारोहाचे राज्यस्तरीय समन्वयक रामेश्वर नाईक व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

शीख समाजात विविधता आहे. सिकलीगर समाजाने शीख समाजाला हत्यारे तयार करून दिली. बंजारा समाजाने शीख समाजांच्या गुरुंप्रती व विचारांप्रती आपली कर्तव्यतत्परता जागृत ठेवली. एक ओमकार सतनाम यातील तत्वाप्रमाणे विविधतेतील एकात्मभाव लंगरच्या माध्यमातून सर्व समाजाने समाजमनावर बिंबवला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. धर्मासाठी एवढे मोठे बलिदान जगाच्या पाठीवर कुठे आढळणार नाही. बलिदान देऊनही गुरुवाणीमध्ये मानवतेचे शब्द व मानवतेची प्रार्थना ही प्रत्येकाला भावनारी आहे. विशेषतः संत नामदेव महाराजांच्या असंख्य ओळी गुरुवाणीमध्ये समाविष्ट करून तेवढ्याच नम्रतेने त्यांना पुजले जाते, हे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

मानवता, सत्य आणि धर्मरक्षेसाठी गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे योगदान सर्वांना ज्ञात आहे. भगवद्गीतेमध्ये उधृत असलेले वचन गुरु तेगबहादूर साहिब यांनी धर्मसंरक्षणाच्या माध्यमातून प्रत्येकाला पुन्हा प्रत्ययास आणून दिले आहे. जेव्हा जेव्हा धर्मावर अधर्म हावी होईल-आक्रमण होईल, तेव्हा मी धावून येईल असे अभिवचन भगवान श्रीकृष्ण यांनी गीतेमध्ये दिले होते, याची आठवण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या भाषणात करून दिली. सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी मुघलांनी केलेले आक्रमण हे धर्म आणि संस्कृतीवरच होते. हे आक्रमण गुरु तेगबहादूर सिंग यांनी आपल्या बलिदानातून परतावून लावले. महाराष्ट्र शासनाने या भव्य आयोजनातून इतिहासातील ही महत्त्वपूर्ण घटना व इतिहास या कार्यक्रमाच्या माध्यमातून नव्या पीढीपर्यंत पोहोचता केला. गुरु तेग बहादूर सिंग साहीब यांची प्रेरणा, कार्य आणि कर्तृत्व भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. गुरु श्री तेग बहादूर साहिबजी यांच्यावर श्रद्धा असणाऱ्या राज्यभरातील भाविकांना एकत्र आणण्याचे कौतुकास्पद काम या कार्यक्रमाच्या माध्यमातून झाले असल्याचे गडकरी म्हणाले.

ज्या देशाने सर्व विचारप्रवाहांचा, विविधतेचा, धर्म, जात, पंथांचा सन्मान केला, त्या आपल्या भारतावर मुघलांनी आक्रमण केले, प्रचंड अत्याचार केले. हिंदू धर्मातील सौहार्दतेला मिटविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. श्री गुरु तेगबहादूर साहिब यांना धर्मरक्षणासाठी जे बलिदान द्यावे लागले, त्या शौयार्चे अभिवादन करताना मुघलांच्या क्रौयाला कदापि विसरता येणार नाही, असे प्रतिपादन संत ज्ञानी हरनाम सिंग जी यांनी यावेळी बोलताना केले.

येथील धर्मावर मुघलांनी जे आक्रमण केले, ते महाराष्ट्र आणि पंजाबने परतावून लावल्याने आजचा भारत आपण पहात आहोत, असा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. महाराष्ट्राची भूमी ही वीरांची आहे, संतांची आहे, छत्रपती शिवाजी महाराजांची आहे, असे सांगत त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा गौरवपूर्ण उल्लेख करुन त्यांच्या शौयार्लाही अभिवादन केले. शीख समाजात अरदासची परंपरा आहे. अरदासच्या माध्यमातून भक्ती करणारे अनेक पंथ आहेत. यात बंजारा, शिकलकरी, सिंधी, लबाना, मोहयाल ही सारी एक आहेत. या समाजांना एकसंघ करून त्यांना न्याय देण्याचे मोठे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले असल्याचे गौरवोद्गार आपल्या मनोगतात काढले.

# आजपासून हिवाळी अधिवेशन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे बहुप्रतिक्षित हिवाळी अधिवेशन सोमवार, ८ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होत आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, केंद्रीय आणि राज्यमंत्री, विविध विभागांचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि इतर महत्त्वाच्या व्यक्ती नागपुरात येणार आहेत. शहरात सुरक्षा व्यवस्था कडेकोट करण्यात आली आहे. अधिवेशनादरम्यान विविध राजकीय आणि सामाजिक संघटना मोठ्या प्रमाणात मोर्चे, सभा, धरणे, निदर्शने आणि इतर कार्यक्रमांचे आयोजन करतात. अशा घटना कायदा आणि सुव्यवस्थेला आव्हान देतात. शिवाय, दहशतवादी आणि समाजकंटकांच्या कारवायांचा अंदाज घेऊन पोलिस प्रशासनाने कडक उपाययोजना केल्या आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव, विधानभवन परिसर अत्यंत संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. पोलिसांनी जारी केलेल्या आदेशानुसार, विधानभवन परिसर आणि त्याच्या आसपास कोणतीही निदर्शने, कॅमेरा, ड्रोन संचालन, छायाचित्र आणि व्हिडिओ शूटिंग करण्यास सक्त मनाई आहे. परिसरात सुरक्षा दल तैनात करण्यात आले असून सर्व प्रवेशद्वारांवर करडी नजर ठेवण्यात येईल.

ओळखपत्रांच्या आधारे केवळ अधिकृत व्यक्ती आणि वाहनांना विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश दिला जाईल. सामान्य नागरिक आणि खाजगी वाहनांसाठी या मार्गावर वाहतूक पूर्णतः प्रतिबंधित असेल. कोणत्याही संशयास्पद हालचालीत सहभागी असलेल्या किंवा कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अधिवेशनादरम्यान शहरात अनेक मोर्चे निघण्याची अपेक्षा आहे. पोलिसांनी सांगितले की मोर्चे निश्चित केलेल्या मार्गांनी आणि दिशानिर्देशांमध्येच होतील. मार्ग बदलण्याचा किंवा विधानभवनाकडे जाण्याचा प्रयत्न रोखला जाईल. गर्दी नियंत्रणासाठी बॅरिकेड्स आणि अतिरिक्त पोलिस दल तैनात केले जातील. मोर्चे संपताच संबंधित मार्ग वाहनांसाठी पुन्हा उघडले जातील.

# आदिवासी विकास विभागाच्या पत्रानुसार राधिका आकाश अग्रवालवर कारवाई करा

### देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेंची प्रधान सचिवांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. ७ :

आधारभूत किंमत खरेदी योजना पणन हंगाम २०२२-२३ मध्ये प्रादेशिक कार्यालय गडचिरोली अंतर्गत खरेदी केलेल्या धानाच्या भरडाईकरीता गडचिरोली जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एकुण ४२ राईसमिलर्सना करारबद्ध करण्यात आले होते. दरम्यान संबंधित राईसमिलर्सने महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक यांचेसोबत संगनमत करून गंभीर अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार केल्याने देसाईगंज येथील मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीजच्या संचालिका राधिका आकाश अग्रवाल यांचेसह इतर सहा राईसमिलर्सवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.मात्र संबंधीत दोषी आढळून आलेल्या राईसमिलर्सवर अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने आदिवासी विकास महामंडळ मर्यादित नाशिकच्या पत्राला केराची टोपली दाखविण्यात आल्याचे गंभीर बाब लक्षात घेता संबंधीत विभागाकडून देण्यात आलेल्या पत्रानुसार कायदेशीर कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत किशोर कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की गडचिरोली जिल्ह्यात आधारभूत किंमत खरेदी योजना पणन हंगाम २०२२-२३ मध्ये प्रादेशिक कार्यालय गडचिरोली अंतर्गत खरेदी केलेल्या धानाच्या भरडाई करीता गडचिरोली जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एकुण ४२ राईसमिलर्सना करारबद्ध करण्यात आले होते.सदर राईसमिलर्सनी गडचिरोली जिल्ह्यातील आधारभूत खरेदी योजनेतील धान भरडाई करीता उचल करून त्याची जिल्ह्याबाहेर विक्री करून त्याऐवजी बाजारातून निकृष्ठ दजार्चा तांदूळ जिल्हा पुरवठा अधिकारी गडचिरोली यांचे गोदामात जमा करून आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित नाशिक या कार्यालयाने चौकशी समिती नेमून त्यांचेकडून उपलब्ध कागदपत्रांनुसार चौकशी केली असता देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीजच्या संचालिका राधिका आकाश अग्रवाल यांचेसह इतर सहा राईसमिलर्सनी महामंडळाच्या तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक यांचेसोबत संगनमत करून गंभीर अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले होते.

यात प्रामुख्याने कमी बँक गॅरन्टी असतांना १५ हजार ७९७ क्विंटल धानाची उचल करणे. अन्न, नागरी पुरवठा विभागाकडील शासन निर्णय दि.२१ नोव्हेंबर २०२२ मधिल मुद्दा क्रमांक १२ ब नुसार सदरील मिलरकडून किमान एक वषार्साठी बँक गॅरन्टी टीडीआर घेणे आवश्यक असतांना व सदरील बँक गॅरण्टी ही अंतीम हिशोब होईपर्यंत वैध असणे आवश्यक असतांना दि.७ फेब्रुवारी २०२३ रोजी राईसमिलरने दिलेली बँक गॅरण्टी बंद करण्यात आली असून अंतीम हिशोब करण्यापूर्वीच बँक गॅरण्टी परत करण्यात आली. तसेच चौकशी सुरु झाल्यानंतर बँक गॅरण्टी घेण्यात आल्याचा टपका ठेवण्यात आला होता.

ही गंभीर बाब लक्षात घेता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित नाशिक कार्यालयाने गडचिरोली जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,भात भरडाई समन्वय समिती यांना दि.४ ऑक्टोबर २०२३ च्या पत्राच्या अनुषंगाने हंगाम २०२२-२३ मध्ये धान भरडाईत अनियमितता व गैरव्यवहार करणाऱ्या राईसमिलर्सवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत पत्र दिले होते. मात्र तत्कालिन जिल्हाधिकारी गडचिरोली संजय मिना यांनी आढळून आलेल्या दोषी राईसमिलर्स राधिका आकाश अग्रवाल यांचेसह संबंधित सहा राईसमिलर्सवर कोणतीच कारवाई केली नसल्याने गडचिरोलीत सिएमआर मिलींगमध्ये अनियमितता होत असल्याचे निर्दशनास येत असुन उघड संगनमताने कोट्यावधीचा घोटाळा केल्या जात असल्याचे वास्तव आहे.

## विरोधी पक्षनेते पद रिक्त ठेवून संविधानाचा अवमान

# विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधाऱ्यांनी आयोजित केलेल्या चहापानावर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बहिष्कार टाकला आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षनेते पद रिक्त ठेवणे हा संविधानाचा अपमान असून, सरकारला विरोधकांचा आवाज दाबायचा आहे, अशी घणाघाती टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकण्याचे कारण स्पष्ट करताना वडेट्टीवार म्हणाले की, "परंपरेनुसार विरोधी पक्षाला चहापानाचे निमंत्रण दिले जाते. आम्हाला वैयक्तिक निमंत्रणे मिळाली, मात्र दोन्ही सभागृहांतील घटनात्मक महत्त्वाची असलेली विरोधी पक्षनेते पदे रिक्त आहेत. सत्ताधाऱ्यांचा ही पदे भरण्याचा कोणताही मनसुबा दिसत नाही. संविधानावर अविश्वास दाखवणाऱ्या आणि मनमानी कारभार करू पाहणाऱ्या सरकारच्या चहापानाला जाणे आम्हाला योग्य वाटत नाही."

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी इतिहासातील दाखले देत सरकारला आरसा दाखवला. ते म्हणाले, "१९८० मध्ये जनता दलाचे अवघे १४ आमदार असताना आणि



१९८५ मध्ये भाजपचे १६ आमदार असतानाही काँग्रेसने त्यांना विरोधी पक्षनेते पद दिले होते. काँग्रेसने सत्ताधारी म्हणून हे घटनात्मक पद कधीही रिक्त ठेवले नाही. मात्र, सध्याच्या सरकारला विरोधकांची भीती वाटते का? की त्यांना कोणाचाही अंकुश नसताना मनमानी कारभार करून राज्याचा गाडा हाकायचा आहे?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

राज्यातील शेतकरी प्रश्नांवरूनही वडेट्टीवार यांनी सरकारला धारेवर धरले. "राज्यात दररोज सहा ते सात शेतकरी आत्महत्या करत आहेत. मतांसाठी कर्जमाफीचे आश्वासन देणाऱ्या सरकारने आता 'तारीख पे तारीख'चा खेळ सुरू केला आहे. आता जूनचा मुहूर्त सांगितला जात असला तरी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा काहीही पत्ता नाही," अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांच्या फसवणुकीचा आरोप केला.

देशभरात २०१४ सालापासून एक लाख १२ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यातील ३८.५ टक्के शेतकरी हे महाराष्ट्रातील आहेत. हे सत्ताधाऱ्यांना भूषणावह आहे का? असा विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रात २०२५ साली पहिल्या आठ महिन्यात ११८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. २०२४ साली २७०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

हे नतभ्रष्ट सरकार आहे. तिघेही जण भांडत आहेत. पण, शेतकऱ्यांकडे यांचे लक्ष नाही. हे म्हणतात की, आम्ही २७ नोव्हेंबरला अतिवृष्टी संदर्भातील मदतीचा प्रस्ताव पाठवला. केंद्रीय कृषिमंत्री म्हणतात की, आमच्याकडे प्रस्तावच आला नाही. तो कदाचित गृहमंत्र्यांकडे अडकून पडला होता, अशी देखील काही चर्चा होत आहे.

## आज सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

देशाच्या संरक्षणासाठी आपल्या प्राणाची बाजी लावून वेळप्रसंगी बलिदान देणाऱ्या सैनिकांच्या कल्याणासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन केला जातो. सशस्त्र सेना ध्वजनिधी संकलनाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवार दि. ८ डिसेंबर रोजी होणार आहे. मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान रामगिरी येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या विशेष कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, चंद्रशेखर बावनकुळे, शंभुराज देसाई, राज्यमंत्री ॲड आशीष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## बावनकुळेंची नोटीस मिळालेली नाही

# माफी मागणार नाही : सुलेखा कुंभारे

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ७ :



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कायदेशीर नोटीस पाठवल्याची बातमी मीडियात पसरवली असली तरी, मला अद्याप कोणतीही नोटीस मिळालेली नाही, असा दावा माजी राज्यमंत्री तथा बहुजन रिपब्लिकन एकता मंचच्या अध्यक्षा ॲड. सुलेखा कुंभारे यांनी केला आहे. कोणत्याही परिस्थितीत माफी मागणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

एका निवेदनाद्वारे कुंभारे यांनी बावनकुळेंच्या कृतीचा जाहीर निषेध केला. महसूलमंत्री आणि नागपूरचे पालकमंत्री यांसारख्या जबाबदार पदावर असलेल्या मंत्र्याने अशा पद्धतीने खोटी बातमी मीडियात पसरवणे अशोभनीय असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मी बावनकुळेंच्या कायदेशीर नोटीसची वाट पाहत आहे. नोटीस मिळाल्यास कायदेशीर भाषेत चोख उत्तर देणार असल्याचे कुंभारे यांनी सांगितले. आम्ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भीमसैनिक आहोत, आम्ही लढायला भीत नाही. ताकदीने लढाई लढणार आणि जिंकणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बावनकुळेंनी मीडियातून माफी मागण्याची किंवा कायदेशीर लढाईला तयार राहण्याची धमकी दिली आहे. मात्र, मी माझ्या शब्दावर ठाम असून कोणत्याही परिस्थितीत माफी मागणार नाही, असे कुंभारे यांनी स्पष्ट केले. त्यांची लढाई कामठी नगरपरिषद निवडणुकीत भाजप उमेदवारांकडून मतचोरीसाठी झालेल्या गंभीर प्रकाराबाबत आहे.

मोठ्या प्रमाणावर पैशांचा गैरवापर करून अग्रवाल भवन आणि एस. फार्मवर घडलेल्या गैरकायदेशीर प्रकाराने निवडणूक आचारसंहितेचे भाजप उमेदवारांकडून थेट उल्लंघन झाले. त्याविरुद्ध आवाज उचलण्याचा लोकशाहीत आम्हाला अधिकार आहे, असे कुंभारे म्हणाल्या. एस. फार्मवर मिळालेले आक्षेपार्ह साहित्य, भाजप उमेदवार अग्रवाल यांचा पुतण्या, बोगस मतदार आणि बोटाची शाई मिटवणारे लिक्विड घटनास्थळी निवडणूक अधिकारी व पोलीस प्रशासनाने जप्त केले होते. पुण्यातील महारवतनाच्या जमीन गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवार हे मुख्य आरोपी आहेत, असे कुंभारे यांनी म्हटले आहे. पार्थ अजित पवार यांच्याकडे कंपनीचे ९९% शेअर्स असतानाही त्यांचे एफआयआरमध्ये नाव नाही किंवा त्यांना अटकही झाली नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. हा घोटाळा महसूल खात्यांतर्गत झालेला आहे.

# विरोधी पक्षनेते नियुक्तीवर राम शिंदेंचे सूचक विधान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तयारींचा आढावा घेतला. हिवाळी अधिवेशनात सर्व सुविधा पुरविण्याचा तसेच सर्व व्यवस्था सुरळीत करण्यासाठी त्यांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना सूचना केल्या. यानंतर राम शिंदे आणि नीलम गोऱ्हे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

विधानपरिषदेच्या मंत्री परिषद सभागृहात त्यांनी विरोधी पक्ष नेत्याच्या नियुक्तीबाबत महत्वपूर्ण विधान केले. उल्लेखनीय आहे की राज्यात सरकार स्थापित झाल्यापासून विरोधी पक्ष नेत्याचे पद रिक्त आहे. विरोधी पक्षाच्या नेत्याची नियुक्ती न करताच मागील अनेक अधिवेशन सरकारने काढले आहेत. त्यामुळे या अधिवेशनात विरोधी पक्ष नेत्याबाबत निर्णय घेतला जातो का, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

हिवाळी अधिवेशनासाठी संपूर्ण व्यवस्था झाली आहे. परिसरात पाणीपुरवठा, आरोग्य, अग्नीशमन, सुरक्षा यासह सर्व अत्यावश्यक सुविधा पुरविण्यासाठी संबंधित विभागांना आदेश दिले गेले आहेत, अशी माहिती राम शिंदे यांनी दिली. विरोधी पक्ष नेत्याच्या नियुक्तीबाबत प्रश्न विचारले असता त्यांनी महत्वपूर्ण माहिती दिली. राम शिंदे म्हणाले, ही पत्रपरिषद अधिवेशनातील तयारींचा आढावाबाबत माहिती देण्यासाठी घेण्यात आली आहे. उद्या सभागृहात काय होणार, हे आज कसे सांगता येणार? विरोधी पक्ष नेत्याची नियुक्ती यासारख्या संवैधानिक प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी ही जागा नाही. विरोधी पक्ष नेत्याच्या नियुक्तीबाबत प्रस्ताव सादर

योग्य वेळी या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येईल.



उल्लेखनीय आहे की, महाराष्ट्रात विरोधी पक्षनेता नसण्याची परिस्थिती ही लोकशाहीच्या कार्यप्रणालीतील एक महत्त्वाची पोकळी मानली जाते.

विधानसभेत विरोधी पक्षनेता हा केवळ एका पक्षाचा प्रतिनिधी नसून संपूर्ण विरोधी पक्षांचे नेतृत्व करणारा संवैधानिक दर्जाचा पदाधिकारी असतो. सरकारच्या निर्णयांवर लक्ष ठेवणे, धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे, जनतेच्या हिताशी निगडित मुद्दे प्रभावीपणे पुढे मांडणे आणि विविध समित्यांमध्ये संतुलन राखणे यासाठी या पदाचे अस्तित्व अत्यंत महत्त्वाचे असते. परंतु महाराष्ट्रात प्रमुख विरोधी पक्षाकडून अद्याप या पदासाठी अधिकृत निवड न झाल्याने विधानसभेतील सत्तेवर आवश्यक त्या प्रमाणात संस्थात्मक नियंत्रण राहिलेले नाही. या पार्श्वभूमीवर यंदाच्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्ष नेत्याची नियुक्ती केली जाते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तरुणांचे इनोव्हेटिव्ह प्रस्ताव

### जनसंपर्क कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमाला रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सामाजिक, शैक्षणिक, रोजगार, पायाभूत सुविधा आणि शासकीय योजनांशी संबंधित विविध प्रश्नांसाठी नागरिकांनी थेट मंत्र्यांशी संवाद साधत आपल्या मागण्यांची मांडणी केली.

कार्यक्रमात अनेक तरुणांनी त्यांच्या स्टार्टअप कल्पना, तांत्रिक नवकल्पना आणि सामाजिक उपक्रमांबाबत इनोव्हेटिव्ह प्रस्ताव ना. नितीन गडकरी यांच्यासमोर सादर केले. काहींनी रस्त्यांची दुरुस्ती, नवीन रस्त्यांची मागणी तसेच वाहतूक सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजनांवर नितीन गडकरी यांच्याशी संवाद साधला. नितीन गडकरी यांनी निवेदने स्वीकारून संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

दिव्यांग नागरिकांचीही यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. त्यांनी कृत्रिम अवयवांची तसेच सहाय्यक साधनांची मागणी केली. ई-रिक्षा, तीनचाकी आदींसाठी नितीन गडकरी यांना दिव्यांगांनी निवेदन दिले. तर काहींनी कृत्रिम अवयव व इतर सहकार्य प्राप्त झाल्याबद्दल नितीन गडकरी यांचे आभार मानले. यावेळी अनुकंपा तत्त्वावरील नोकरी, श्रावणबाळ योजना तसेच इतर शासकीय सामाजिक सुरक्षायोजनांमधील आर्थिक मदत मंजूर करून द्यावी, अशा स्वरूपाची निवेदनेही अनेकांनी दिली. वृद्ध, महिला आणि वंचित घटकांच्या शासकीय लाभांबाबत आलेल्या तक्रारी आणि सूचना मंत्र्यांनी लक्षपूर्वक ऐकून घेतल्या.

गडकरी यांनी उपस्थित नागरिकांच्या सर्व मागण्यांची नोंद घेऊन संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हाधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, पीडब्ल्यूडी, भूमि अभिलेख, जिल्हा परिषद, समाज कल्याण विभाग, सीआरसी सेंटर, नगर भूमापन अधिकारी, सेतू कार्यालय, पोलीस विभाग, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मुख्यमंत्री सहायता कक्ष, महावितरण, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.